
१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/

Download Our Apps



पान ३ / अतिक्रमांच्या विळख्यातून...

जळगाव, बुधवार, दि.६ मे २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -१६८ • पाने ६ • किंमत ३ रु.

## सोने-चांदी

- सोने (प्रति १० ग्रॅम) : १,५०,०००
- चांदी (प्रति १ किलो): २,४६,०००

## तापमान

- कमाल : ४० अंश सेल्सिअस
- किमान : २५ अंश सेल्सिअस

## अग्निहोत्र समय

| दि.६ | दि.७ |
|---|---|
| सूर्योदय : ५.५८ वा. | सूर्योदय : ५.५८ वा. |
| सूर्यास्त : ६.५१ वा. | सूर्यास्त : ६.५१ वा. |

## महत्वाचे

### अनेक मुलींचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ

**चाळीसगाव :** चाळीसगाव शहराला हादरवून सोडणाऱ्या तरुणीच्या ब्लॅकमेलिंग प्रकरणात आता अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी यश महेंद्र जैन याच्या अटकेनंतर पोलिसांनी त्याच्या मोबाईलची प्राथमिक तपासणी केली असता, केवळ एका तरुणीचे नव्हे तर इतर अनेक मुलींचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या नव्या खुलाशामुळे या गुन्ह्याची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता व्यक्त होत असून, शहरात भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने आपल्या मोबाईलमध्ये मोठ्या प्रमाणात आक्षेपार्ह फाईल्स साठवून ठेवल्या होत्या. पोलीस अधीक्षक श्रीकांत ढिवरे यांनी सांगितले की,''तपासादरम्यान काही महत्त्वाचे धागेदोरे मिळाले असून आरोपीच्या मोबाईलमध्ये संशयास्पद फोटो आणि व्हिडिओ आढळले आहेत. मात्र, हे नेमके कोणाचे आहेत आणि यामागे मोठे रॅकेट आहे का, हे तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल.'' दरम्यान, पोलिसांनी आरोपी यश जैन याला अटक करून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला पोलीस कोठडी सुनावली असून, सायबर तज्ज्ञांच्या मदतीने मोबाईलमधील डिलीट केलेला डेटा रिकव्हर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणामुळे आता मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. आरोपीने याआधी किती मुलींना अशाच प्रकारे जाळ्यात ओढले होते? सामाजिक प्रतिष्ठेच्या भीतीने अनेक मुली समोर येत नसल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### आयशरचा भीषण अपघात दोघांचा मृत्यू, एक जखमी

**मुक्ताईनगर** – भरधाव वेगाने धावणाऱ्या आयशर गाडीमुळे झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही घटना ४ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ८.१५ वाजता पिंप्री नांदू रोडवरील मरिमाता मंदिराजवळ घडली. या प्रकरणी मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात १९१/२०२६ अन्वये भादंवि कलम १०५, १२५(अ), १२५(ब), २८१, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातात गजानन हिरामण पाटील (वय ४२) व अश्विनी गजानन पाटील (वय ३४, दोघेही रा. कोचूर, ता. रावेर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर हेमांगी गजानन पाटील (वय अंदाजे दीड वर्ष) ही गंभीर जखमी झाली आहे.

# आम्हाला हरवण्यात आले, राजीनाम्याचा प्रश्नच नाही!

## ममता बॅनर्जी यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार : पोलिसांनी काढले निवासस्थानाबाहेरील स्टीलचे ॲडव्हान्स गेट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** वृत्तसंस्था

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. यात भाजपने दणदणीत विजय मिळवला. अशातच आज ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला आहे. आम्ही निवडणूक हरलो नाही, आम्हाला हरवण्यात आले आहे, त्यामुळे राजीनाम्याचा प्रश्नच नाही असं बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता बंगालमध्ये संवैधानिक संकटासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आता राज्यपालांसमोर नेमके काय पर्याय आहेत. पत्रकार परिषदेत राजीनाम्याच्या प्रश्नावर बोलताना ममता बॅनर्जी म्हणाल्या की, माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच नाही. नैतिकदृष्ट्या आमचा विजय झाला आहे. मी राजभवनात जाऊन राजीनामा देणार नाही. आता पुढील रणनीतीबाबत पक्षाच्या सदस्यांसोबत चर्चा केली जाईल. मी आता भाजपाच्या अत्याचारांना अधिक सहन करणार नाही. मी



रस्त्यावर उतरून लढा देईन. पुढे बोलताना त्यांनी आमचा सामना भाजपाशी नव्हता, तर निवडणूक आयोगाशी होता आणि आयोगाने भाजपासाठी काम केले असा गंभीर आरोप केला आहे. आता ममता बॅनर्जी यांच्या या भूमिकेमुळे राज्यात संवैधानिक पेच निर्माण होऊ शकतो. मात्र, सरकार स्थापनेवर त्याचा थेट परिणाम होणार नाही. वरिष्ठ वकील शेखर नाफडे यांनी सांगितले की, जर ममता यांनी राजीनामा देण्यास नकार दिला, तर संविधानानुसार राज्यपाल त्यांचे सरकार बरखास्त करू शकतात, कारण निवडणूक आयोगाने आवश्यक अधिसूचना आणि जनादेश जारी केला आहे. निवडणूक निकालांना आव्हान देण्याचा ममता अधिकार कोणीही काढून घेऊ शकत नाही. मात्र, न्यायालयाकडून आदेश येईपर्यंत त्यांना निवडणूक आयोगाच्या जनादेशाचे पालन करावे लागेल. शेखर नाफडे यांनी पुढे बोलताना म्हटले की, 'विधानसभा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर राज्यपाल विधानसभा बरखास्त करू शकतात. पश्चिम बंगालच्या विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ ७ मे २०२६ रोजी संपत आहे. सध्या आर. एन. रवी हे बंगालचे राज्यपाल आहेत. ते ७ तारखेनंतर सरकार बरखास्त करण्याचा निर्णय घेऊ शकतात. त्यामुळे ममता बॅनर्जी यांनी राज्यपालांना भेटून राजीनामा दिला

पान २ वर »

### निवासस्थानाबाहेरील गेट हटवले

मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी यांच्या कालीघाट येखील निवासस्थानाबाहेर स्टीलचे ॲडव्हान्स गेट बसवले होते, मात्र मतमोजणीनंतर ते काढून टाकण्यात आले आहे. तसेच हा रस्ता आता सामान्य नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. हे गेट हटवतानाचा व्हिडिओही समोर आला आहे. पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षे सत्तेत असलेल्या टीएमसीच्या सत्तेचा अंत झाल्यानंतर बंगाल पोलिसांनी हा निर्णय घेतला आहे.

# मंत्रिमंडळ बैठकीत तीन मोठे निर्णय

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (५ मे २०२६) मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या बैठकीत अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. सोबतच राज्यात राज्यातील शिक्षण, विद्यार्थी यांच्या हिताचे काही निर्णय घेण्यात आले. या बैठकीत आदिवासी विकास विभागाअंतर्गत एक तर उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत दोन निर्णय घेण्यात आहेत. या निर्णयांमुळे आदिवासी मुलांच्या



शिक्षणप्रगतीत मोठी मदत होणार आहे. तसेच धाराशीव आणि सोलापूर या दोन जिल्ह्यांच्या विद्यार्थ्यांनाही उच्च दर्जाचे अभियांत्रिकीचे शिक्षण अधिक सुलभ पद्धतीने मिळणार आहे. आदिवासी बांधवांच्या मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्वपूर्ण निर्णय. स्वयंसेवी संस्थाच्या पाच प्राथमिक व १९ माध्यमिक अनुदानित आश्रमाशाळांची श्रेणीवाढ. प्राथमिकमधून माध्यमिक आणि माध्यमिकमधून कनिष्ठ महाविद्यालय अशी श्रेणीवाढ, त्यासाठी आवश्यक पदनिर्मिती व आवश्यक खर्चाच्या तरतूदीस मंजुरी. डोंगराळ, दुर्गम भागातील आदिवासी बांधवांच्या मुलांचे शिक्षण गतीमान होणार. सोलापुरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये या शैक्षणिक वर्षापासून (सन २०२६-२७)

पान २ वर »

# गोकुळ दूध संघावर अखेर प्रशासकाची नियुक्ती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**कोल्हापूर** प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रमुख सत्ता केंद्र असलेल्या गोकुळ दूध संघावर अखेर प्रशासक मंडळाची नियुक्ती झाली आहे. साताराचे उपनिबंधक संजय कुमार सुद्रिक यांच्या अध्यक्षतेखालील प्रशासक समितीने कार्यभार देखील स्वीकारला आहे. गोकुळ दूध संघावर प्रशासक नियुक्त होऊ नये यासाठी शेवटपर्यंत प्रयत्नशील असलेल्या मंत्री हसन मुश्रीफ यांना निमित्ताने



मोठा धक्का बसला आहे. संघावर प्रशासक नियुक्ती वरून कोल्हापुरात महायुतीमध्ये राजकीय ठिणगी पडली असून याचे दूरगामी परिणाम जिल्ह्याच्या राजकारणात होणार असल्याचे म्हटले जात आहे. कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळ दूध संघाच्या विद्यमान संचालक मंडळाची मुदत काल ४ मे रोजी संपली आहे. मुदत संपताच या दूध संघावर प्रशासक समितीची नेमणूक करण्यात आली आहे. सातारा जिल्ह्यातील उपनिबंधक संजय कुमार सुद्रिक या प्रशासक समितीचे अध्यक्ष असून अन्य चार सदस्य देखील या समितीमध्ये आहेत. गोकुळ दूध संघावर प्रशासक येऊ नये यासाठी मंत्री हसन मुश्रीफ प्रकाश आबिटकर हे शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्नशील होते.या संदर्भात दोन्ही नेत्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट देखील घेतली होती. भाजपने या सर्वांनाच धक्का देत गोकुळवर प्रशासक नेमल्याने महायुतीला धक्का बसला आहे. गोकुळ दूध संघाच्या या प्रशासक नियुक्तीवरून गेल्या महिन्याभरापासून कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. चंदगडचे भाजप समर्थक आमदार शिवाजी पाटील यांनी तर

पान २ वर »

# नंदुरबार जिल्ह्यात बर्ड फ्लूने उडवला हाहाकार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नंदुरबार** प्रतिनिधी

राज्यातील नंदूरबार जिल्ह्यात बर्ड फ्ल्यूने हाहाकार उडवला आहे. नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर येथे अनेक पोल्ट्री फार्ममधील कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागन झाल्याचं उघड झालं आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली असून



ज्या ज्या पोल्ट्री फार्मवर कोंबड्यांना बर्ड फ्ल्यूची लागण झाल्याचं आढळून आलं आहे, त्या ठिकाणच्या सर्व कोंबड्या मारण्यास सुरुवात झाली आहे. तसेच अंडेही नष्ट केले जात आहेत. तसेच या भागातील नागरिकांना चिकन आणि अंडी खाण्यास मनाई करण्यात आली असून आरोग्याची काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. नवापूर परिसरात बर्ड फ्लूच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मोठी आणि कठोर कारवाई हाती घेतली आहे. या चार दिवसांत तब्बल ८ पोल्ट्री फार्ममधील १ लाख ९३ हजार ६६७ पक्ष्यांचे किलिंग करण्यात आले आहे. यासोबतच ८ लाखांहून अधिक अंडी नष्ट करण्यात आली असून सुमारे २१. २२ मॅट्रिक टन पशुखाद्य जमिनीत गाडून नष्ट करण्यात आले आहे, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. संजय खाचणे यांनी ही माहिती दिली आहे. बर्ड फ्यू संसर्गाचा फैलाव रोखण्यासाठी

पान २ वर »



जळगाव : अंगारक चतुर्थीच्या निमित्ताने सकाळी ब्रह्म मुहूर्तावर ४: ३० वाजता जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या शुभहस्ते श्रीक्षेत्र पद्मालय येथे पूजा करण्यात आली. गणेश वैद्य व केशव पुराणे यांनी यावेळी पूजा सांगितली. यावेळी देवस्थानचे विश्वस्त आनंदराव पाटील, अर्जुन पाटील, गोकुळ देशमुख, भिका पाटील, पांडुरंग पिंगळे, अमित पाटील, राजेश तिवारी, शिरीष बर्वे, अशोक पाटील, आनंद पाटील आदी उपस्थित होते.

# अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त श्री मंगळग्रह मंदिर फुलले



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

येथील श्री मंगळग्रह मंदिर मंगळवार, दि. ५ मे रोजी अंगारक संकष्ट चतुर्थीनिमित्त देशातील विविध राज्यांसह महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतील भाविकांच्या गर्दीने फुलल्याचे चित्र दिसून आले. निमित्त होते यंदाच्या अर्थात २०२६ या वर्षातील द्वितीय अंगारक योग असलेल्या संकष्ट चतुर्थीचे. हिंदू धर्मात संकष्टी चतुर्थीला विशेष महत्त्व आहे. पण जेव्हा ही चतुर्थी मंगळवारी येते तेव्हा तिला 'अंगारकी चतुर्थी' म्हटले जाते. मंगळवार, दि. ५ मे रोजी यंदाच्या वर्षातील द्वितीय अंगारक संकष्ट चतुर्थी (वैशाख वद्य चतुर्थी) अत्यंत दुर्मिळ आणि शुभ योगासह आलेली असल्याने भाविकांनी दर्शन, पूजा अभिषेकासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. बरेच भाविक सोमवार, दि. ४ मे रोजीच रात्री उशिरापर्यंत श्री मंगळग्रह मंदिरात दर्शन, पूजा अभिषेकासाठी दाखल झाले होते. आज पहाटे ५.२५ वाजेपासूनच चतुर्थीचा प्रारंभ होणार असल्याने श्री मंगळग्रह मंदिरात फुलांची आकर्षकरित्या सजावट करण्यात आलेली होती. त्यात या मुहूर्तावर श्री मंगळग्रह देवासह प्रारंभी पहाटे पाचच्या सुमारास श्री गणपती बाप्पा, पंचमुखी हनुमानजी आणि श्री मंगळग्रह देवता यांचे यजमानांच्या शुभ हस्ते विधिवत विशेष पूजन करण्यात आले. त्यानंतर भाविकांनी मंदिर परिसरातील भगवान श्री गुरुदत्त भगवान-श्री अनघालक्ष्मी

पान २ वर »

# पीडित मुलीचा मृत्यू ॲस्फिक्सियामुळे!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका साडेतीन वर्षांच्या मुलीवर एका नराधमाने अत्याचार करुन तिला निर्घृणपणे संपवल्याची घटना १ मे रोजी घडली होती. या घटनेनंतर राज्यभरात संताप व्यक्त होत आहे. लहान मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला तात्काळ फाशी द्यावी, या मागणीसाठी नसरापूरचे ग्रामस्थ आक्रमक



आहेत. अशातच या चिमुरड्या मुलीचा शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. या अहवालातील माहिती अंगावर अक्षरशः काटा आणणारी आहे. तर या घटनेतील चिमुरड्या मुलीचा मृत्यू कशामुळे झाला त्याची माहिती देखील समोर आली आहे. नसरापूर घटनेतील पीडित मुलीचा मृत्यू ''ॲस्फिक्सिया'' मुळे झाल्याचे समोर आले आहे. ही माहिती पोस्टमॉर्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे. ॲस्फिक्सिया म्हणजे श्वास कोंडणे, याच कारणामुळे चिमुरडीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. नराधमाने चिमुरडीच्या तोंडात मोजा कोंबल्यामुळे चिमुरडीचा श्वास कोंडला गेला आणि त्यात तिचा जीव गेला. तसेच पीडित

पान २ वर »

# बदरखे शिवारात शेतमजुराची गळफास

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी



पाचोरा तालुक्यातील बदरखे येथील शेतशिवारात एका ३६ वर्षीय शेत मजुराने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविल्याची घटना घडली आहे. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सुभाष पंडित राऊत (वय - ३६ वर्ष) रा. मेळवाडी, सिसारखेडा, ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजी नगर हे आपल्या परिवारासह बरदखे ता. पाचोरा येथे शेत मजुरी कामानिमित्त वास्तव्यास होते. ५ मे रोजी सकाळच्या सुमारास बदरखे शेत शिवारातील झाडास सुभाष राऊत यांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह सुधाकर गढरी यांना आढळून आला. घटनेची माहिती मिळताच नगरदेवळा आऊटपोस्ट पोलिस स्टेशनचे

पान २ वर »

# भडगाव तहसीलदार सोलाट यांना न्यायालयाचा दणका!

## टोणगाव शिवारातील वारस नोंद कमी केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी

मौजे टोणगाव येथील गट नं. ५६१/१ ह्या वडिलोपार्जित शेतजमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर १९७४ साली नबाबाई शामा पाटील यांचे नाव वारस म्हणून लागले होते. सदर वारसाची संमती न घेता कदिरखान यांनी सदर जमीन विकत घेऊन स्वतःचे नाव लावून घेतले. काळानुसार जमीन भडगाव शहरात मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे जमिनीचे भाव गगनाला भिडले, तसेच पाचोरा - चाळीसगाव राष्ट्रीय महामार्ग सदर जमिनीच्या लगतच असल्यामुळे शेतजमिनीला रहिवासी प्रयोजनाची मागणी देखील वाढली. परंतु प्लॉट पडल्यावर कायदेशीर वारस नबाबाई शामा यांची संमती असल्याखेरीज प्लॉट विकले जाऊ शकत ही बाब कळून चुकल्यामुळे कदिरखान यांनी तहसीलदार शीतल सोलाट यांच्यासोबत हात मिळवणी करत नबाबाई शामा ह्या कायदेशीर वारसाचे नावच ७/१२ उताऱ्यातून वगळल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. दरम्यान तहसीलदार शीतल सोलाट यांनी नबाबाई शामा यांचे नाव वगळल्याच्या दिवशीच जुना ७/१२ बंद करून रहिवासी प्रयोजनार्थ प्लॉट पाडल्याचे देखील आदेश घाई गडबडीत दिले. प्रकरणी नबाबाई शामा यांच्या सुन ताराबाई विठ्ठल पाटील यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात रिट याचिका दाखल केली असता न्या. संतोष चपळगावकर यांच्यासमोर दिनांक २७ एप्रिल रोजी सुनावणी पार पडली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता तहसीलदार शीतल सोलाट तसेच कदिरखान यांना कारणे दाखवा नोटीस निघाली असून पुढील सुनावणी २२ जून रोजी ठेवली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. भुषण महाजन (गुढे) यांनी उच्च न्यायालयातील कामकाज पाहिले. राज्यातील सुमारे दीड लाख शेतकऱ्यांच्या, त्यांच्या परिवाराच्या ७/१२ उताऱ्यात महसूली अधिकाऱ्यांनी कलम १५५ अंतर्गत फसवणूक केल्याची बाब स्वतः महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १८ मार्च रोजी विधानपरिषदेच्या सभागृहात अधिवेशना दरम्यान कबुल केली होती. महसूल खात्यात आतापर्यंत झालेली ही सर्वात मोठी अनियमितता असून मोठ्या माणसांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून छोट्या माणसांना फसविण्याचे हे मोठे कार्टेल आहे, असे देखील म्हटले होते. त्यायोगे राज्यातील जिल्हाधिकाऱ्यांना चौकशीचे, तसेच दोषी महसूली अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे नोंदविण्याचे आदेश दिले आहेत. कलम १५५ अन्वये महसूली अभिलेख्यांमधील केवळ चुकांची दुरुस्ती करता येते, दुरुस्तीच्या नावाखाली भडगावच्या तहसीलदार शीतल सोलाट यांनी वारसांची नावे कमी केल्याचा आरोप असून उच्च न्यायालयात याचिकाकर्त्याने शीतल सोलाट यांना बडतर्फ करण्याची विनंती केली आहे.

**पान १ वरून**

## आम्हाला हरवण्यात आले...

नाही तरी काही फरक पडणार नाही.तसेच जर मुख्यमंत्री राजीनामा देत नसतील, तर राज्यपाल त्यांना राजीनामा देण्याचा सल्ला देऊ शकतात. तरीही त्यांनी नकार दिल्यास राज्यपाल त्यांना पदावरून काढू शकतात. तसेच राज्यपाल विद्यमान मुख्यमंत्र्यांचा राजीनामा न घेता देखील नव्या विधानसभेत नवीन मुख्यमंत्री नियुक्त करू शकतात. कारण कार्यकाळाच्या मध्यात मुख्यमंत्री बदलण्यास काही संवैधानिक अडचणी असतात, मात्र कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर नवीन विधानसभा स्थापन करण्यास अडथळा येत नाही. निवडणूक आयोगाने ज्यांना विजयाचे प्रमाणपत्र दिले आहे, तेच वैध मानले जातील. त्यामुळे आगामी काळात भाजपचा मुख्यमंत्री बनण्यास काहीही अडचण येणार नाही.

## मंत्रिमंडळ बैठकीत सरकारचे...

पदवीस्तराचे तीन अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यास मंजुरी. सोलापूर आणि आजुबाजुच्या परिसरातील अभियांत्रिकी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरूंच्या दृष्टीने हिताचा निर्णय. प्रत्येकी साठ प्रवेश क्षमतेचे एआय अँण्ड मशिन लर्निंग, कॉम्प्युटर सायन्स अँण्ड इंजिनियरींग, इलेक्ट्रॉनिक्स अँण्ड टेलिकम्युनिकेशन असे तीन नवे अभियांत्रिकी अभ्यासक्रम. धाराशिव जिल्हयातील तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या माध्यमातून चालविण्यात येणारे श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय महाराष्ट्र शासनास हस्तांतरित करण्याचा निर्णय. महाविद्यालयाचे सक्षमीकरण होणार, अद्ययावत शैक्षणिक सोयी-सुविधांमुळे या परिसरातील होतकरूंना दर्जेदार अभियांत्रिकी शिक्षण उपलब्ध होण्याची संधी. दरम्यान, या मंत्रिमंडळ बैठकीत इतरही काही महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला मुख्यमंत्री तसेच वेगवेगळ्या विभागाचे मंत्री उपस्थित होते. लवकरच या निर्णयांची अंमलबजावणी केली जाईल. त्यामुळे या वर्षाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना या निर्णयांचा फायदा होणार आहे.

## गोकुळ दूध संघावर अखेर...

थेट मंत्री मुश्रीफ यांच्यावर गोकुळमध्ये भ्रष्टाचार केल्याचे आरोप केले होते. नियमबाह्यपणे सभासद संस्था वाढवल्याचा आरोप सुद्धा शिवाजी पाटील यांनी केला आहे. गोकुळ दूध संघावर प्रशासक नियुक्त करावा यासाठी आमदार शिवाजी पाटील आग्रही होते. दूध संघावर प्रशासक नियुक्त होताच आमदार शिवाजी पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आभार मानले. जर दूध संघात गैरकारभार केला नसेल तर मंत्री मुश्रीफ प्रशासकांना का घाबरत आहेत असा सवाल करीत थेट त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. चंदगडचे आमदार शिवाजी पाटील यांनी मंत्री मुश्रीफ यांच्यावर गोकुळमध्ये भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप तर केला आहेच शिवाय येणाऱ्या गोकुळच्या निवडणुकीमध्ये मुश्रीफ आपल्यासोबत नकोत अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मांडली आहे. मंत्री हसन मुश्रीफ यांनी मात्र या आरोपांवर फारसं प्रत्युत्तर देणे सध्या तरी टाळलं असून गोकुळ निवडणुकीच्या निकालाचा गुलाल लावूनच आता उत्तर देऊ असं म्हणत गोकुळ त्यांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकल आहे. दरम्यान, गेल्या महिन्याभरापासून गोकुळ दूध संघावरून कोल्हापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या राजकीय घडामोडी पाहता शिवसेना शिंदे गटाने मंत्री हसन मुश्रीफ यांच्या भूमिकेची पाठराखण केली आहे. तर दुसरीकडे भाजप समर्थक मात्र आमदार शिवाजी पाटील यांची साथ देत आहेत. भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांची अदृश्य शक्ती देखील शिवाजी पाटील यांच्यासोबत असल्याची चर्चा जिल्ह्यात आहे . त्यामुळे कोल्हापूर जिल्ह्यात गोकुळच्या प्रशासक नियुक्तीवरून शिवसेना शिंदे गट ,राष्ट्रवादी विरुद्ध भाजप अशी स्थिती निर्माण झाली आहे. महायुतीमध्ये पडलेली ही वादाची ठिणगी गोकुळ दूध संघापर्यंतच मर्यादित राहते की त्याचे पडसाद जिल्ह्यातील पुढील राजकारणावर देखील होतात हे पाहणं आता महत्वाचे ठरणार आहे.

## नंदुरबार जिल्ह्यात बर्ड...

प्रशासनाकडून युद्धपातळीवर उपाययोजना सुरू आहेत. परिसरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्याने प्रशासन सतर्क झाले आहे. तीन पोल्ट्री फार्ममध्ये बर्ड फ्लूचे अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी बाधित क्षेत्राची पाहणी करत परिस्थितीचा आढावा घेतला. या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात कलिंग ऑपरेशन राबवण्यात येत असून त्यासाठी सुमारे १५० कर्मचाऱ्यांच्या २५ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. संसर्ग रोखण्यासाठी १ किलोमीटर, ३ किलोमीटर आणि ५ किलोमीटर अशा परिघात क्षेत्र निश्चित करून उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. इतर पोल्ट्री फार्ममधील नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, त्यांच्या अहवालाची प्रतीक्षा आहे. बर्ड फ्लूचा संसर्ग वाढू नये यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी खबरदारी घेतली जात असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी स्पष्ट केले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर भागात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव आढळल्याने मालेगावसह नाशिक जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर आले असून सर्व कुक्कुटपालक आणि पोल्ट्री फार्म चालकांना सतर्क राहण्याचा इशारा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिला आहे. पक्ष्यांचा अचानक मृत्यू, खाद्य-पाणी कमी घेणे, सुस्ती किंवा अंडी उत्पादन घटल्यास तात्काळ प्रशासनाला कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**निधन वार्ता**

### एकनाथ पाटील

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सावदा** प्रतिनिधी



स्वामिनाराण मंदिर परिसरातील रहिवासी व सावदा न पा सेवानिवृत्त प्रभाकर एकनाथ पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्याची अंत्ययात्रा संध्याकाळी ५ वा राहत्या घरुन निघाली. ते चंदकांत पाटील यांचे वडील होते.

## अंगारक संकष्ट...

माता तसेच श्री कालभैरवनाथ-श्री माता भैरवी यांचे तसेच श्री स्वामी समर्थ महाराज व मंगळेश्वर महादेवांचेही दर्शन घेतले. ही चतुर्थी बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी सकाळी ७.५१ वाजेपर्यंत आहे. त्यामुळे ही अंगारकी अहोरात्र आहे. या दिवशी शिवयोग आणि बुधादित्य योग जुळून आलेले असल्याने हा दिवस भाविकांसाठी अधिक फलदायी मानला गेला. या दिवशी उपवास केल्याने वर्षभरातील सर्व (२१) संकष्टी चतुर्थींचे पुण्य लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. आजच्या दिवशी रात्री चंद्रोदयाची वेळ १०.३५ च्या सुमारास होती. त्यामुळे अनेक भाविकांनी चंद्रोदयानंतर चंद्राला अर्घ्य देऊनच उपवास सोडल्याचे पाहावयास मिळाले. स्कंद पुराणानुसार अंगारक यांनी गणपती बाप्पांची कठोर तपश्चर्या केली होती. त्यामुळे प्रसन्न होऊन बाप्पांनी त्यांना आशीर्वाद दिला, की मंगळवारी येणारी चतुर्थी 'अंगारकी' नावाने ओळखली जाईल. या दिवशी उपवासाचे व्रत केल्याने कर्जमुक्ती मिळते, आत्मविश्वासात वाढ होऊन रखडलेली कामे मार्गी लागून संकटे दूर होतात. या दिवशी पहाटे स्नान करून उपवास व्रताचा संकल्प करावा. दिवसभर फलाहार किंवा निर्जळी उपवास ठेवावा. गणपती बाप्पांना २१ दुर्वा आणि मोदकांचा नैवेद्य समर्पित करावा. रात्री चंद्र दिसल्यानंतर चंद्राची पूजा करून आणि गणपती बाप्पांची आरती करून उपवास सोडावा.

## पीडित मुलीचा मृत्यू...

चिमुरडीच्या अंगावर जखमा आल्या आढळून आल्याची माहिती पोस्टमॉर्टम रिपोर्ट मधून माहिती समोर आली आहे. जेव्हा आपल्याला श्वास घेता येत नाही किंवा शरीरात ऑक्सिजन कमी पडतो, तेव्हा त्या अवस्थेला ॲस्फिक्सिया म्हणतात. पोस्टमार्टम रिपोर्टमधून समोर आलेल्या माहितीवरुन नराधमाने या मुलीवर अत्याचार केल्यानंतर तिला किती निर्घृणपणे मारले होते, हे दिसून येत आहे. ही मुलगी आपल्या पालकांसह पुण्यात राहत होती. ती उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आपल्या आजोळी नसरापूर येथे गेली होती. ती खेळत असताना आरोपीने तिला गोठ्यात वासरु दाखवायला नेतो सांगून आपल्यासोबत नेले होते आणि तिच्यावर अत्याचार केले होते. या प्रकरणातील आरोपी असलेल्या नराधमावर यापूर्वीही महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल आहेत. नसरापूरमधील पिडीतेच्या शवविच्छेदन अहवालात अनेक हादरवणाऱ्या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत. या अहवालात नमूद केल्याप्रमाणे मुलीच्या तोंडात मोजा कोंबण्यात आला होता. लैंगिक अत्याचार करून तिचा खून करताना आरोपीने मुलीच्या तोंडात पाय मोजा कोंबल्याचे तसेच छातीवर वळ उमटले असल्याचे शवविच्छेदन करताना निदर्शनात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या चिमुरडीची किती निर्घृणपणे हत्या करण्यात आली हे समजून येत आहे. ससून रुग्णालय प्रशासनाने शवविच्छेदनाचा प्राथमिक अहवाल पोलिसांना दिला आहे. हा अहवाल समोर आल्यानंतर आणखी संतप्त प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे. अगोदर या प्रकरणावरुन राज्य सरकार आणि पोलीस यंत्रणा टीकेच्या भोवऱ्यात सापडले आहेत. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणातील आरोपीची वैद्यकीय चाचणी देखील केली आहे. सध्या पोलिसांकडून सर्व पुराव्यांची जुळवाजुळ करण्याचे काम सुरु असून लवकरच आरोपपत्र दाखल होऊन या प्रकरणाचा खटला न्यायालयात सुरु होईल.

## बदरखे शेतशिवारात...

पो. कॉ. दिनेश पाटील हे रुग्णवाहिका चालक किशोर लोहार यांचेसह घटनास्थळी दाखल होवुन घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह रुग्णवाहिका चालक किशोर लोहार यांच्या मदतीने पाचोरा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला. घटनेप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून घटनेचा पुढील तपास पाचोरा पोलिस करीत आहे. मयत सुभाष राऊत यांचे पाश्चात्य वृद्ध आई, पत्नी, तीन मुली, एक भाऊ, एक बहिण असा परिवार असुन सुभाष राऊत यांनी आत्महत्येसारखे पाऊल का उचलले? याचा तपास पोलिस करीत आहेत.

## कलेक्टर दीदींसह शासकीय अधिकाऱ्यांचा भव्य सत्कार



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

श्री क्षत्रिय अहिर शिंपी समाज हितवर्धक संस्था, चाळीसगाव यांच्या वतीने शिंपी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम दि. ३ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल ग्रीन लीफ येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात बहाळ येथील कुमारी मोहिनी अशोक जगताप यांनी यूपीएससी परीक्षेत ३२३ वा क्रमांक मिळवत कलेक्टर पदासाठी पात्र ठरल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच 'कोण बनेगा करोडपती' स्पर्धेतील विजेती व सध्या प्रशासकीय सहाय्यक असलेल्या कुमारी स्नेहा किशोर, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी विश्वजीत किशोर कापुरे, जलसंधारण अधिकारी राकेश मनोहर बिरारी व निखिल सदाशिव बाविस्कर, जलसंपदा विभागातील सिव्हिल इंजिनिअर निखिल अनिल शिंपी, भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदावर कार्यरत परेश सुभाष अहिरराव, तसेच नायब तहसीलदार डॉ. संदेश भगवानराव निकुंभ आणि एम.एस. जनरल सर्जन डॉ. अभिलाष पवार (लंडन) यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सत्कारार्थींनी आपल्या यशाचा प्रवास कथन करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनेश भाऊ बोरसे यांनी सत्कारार्थींना 'नवरत्न' ही उपाधी देत समाजासाठी प्रेरणादायी कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच भविष्यात गरजू समाजबांधवांना नियमांच्या चौकटीत राहून मदत करण्याची विनंती केली. या कार्यक्रमाला समाजातील मोठ्या संख्येने बंधू-भगिनी उपस्थित होते. सत्कारार्थींसह त्यांच्या पालकांचाही शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी वातावरण भावनाप्रधान झाले होते. प्रास्ताविक जितेंद्र खैरनार, सूत्रसंचालन आनंद शिंपी यांनी तर आभार प्रदर्शन घनश्याम शिंपी यांनी केले.

# स्वराज्य चषक नाईट क्रिकेट स्पर्धेचे बक्षिस वितरण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी



शहरात बस स्थानकालगत मैदानावर स्वराज्य चषक नाईट क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन, त्यातच युट्युब लाईव्ह आणि मैदानावर लावण्यात आलेली स्क्रीन मुळे ग्रामीण भागातील लुप्त पावत चाललेले मैदानी खेळ पुन्हा पुनर्जीवित झाले आहे. व मैदानाकडे तरुण वळू लागले आहे. अशा खेळाचे आयोजन नेहमीच झाले पाहिजे असे प्रतिपादन डीवायएसपी अनिल बडगुजर यांनी केले ते यावल येथे आयोजित स्वराज्य चषक नाईट क्रिकेट स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते. या नाईट क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस एकता क्रिकेट संघ व द्वितीय बक्षीस शिवशक्ती संघ आणि तृतीय बक्षिस राजमुद्रा क्रिकेट संघाला मिळाले आहे. यावल शहराच्या इतिहासात प्रथमच बस स्थानक लगत असलेल्या मैदानावर नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. युट्युब लाईव्ह च्या माध्यमातून सदर स्पर्धेचे थेट प्रक्षेपण, त्याचप्रमाणे मैदानावर भली मोठी स्क्रीन लावण्यात आली होती. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या सामन्यांमुळे शहरात रंगत निर्माण झाली होती. तर या स्पर्धेमध्ये राजकीय पदाधिकारी, पोलीस, महसूल, पत्रकार सह विविध संघाचा सहभाग होता. या स्पर्धेचे प्रथम बक्षीस एकता संघाचे कर्णधार शेखर पटेल यांना डी वाय एस पी अनिल बडगुजर यांच्या हस्ते देण्यात आले. तर द्वितीय बक्षीस शिवशक्ती संघाचे कर्णधार सुनील गावडे यांना जिल्हा परिषदेचे माजी गटनेता प्रभाकर सोनवणे तर तृतीय बक्षीस राजमुद्रा संघाचे कर्णधार राहुल सुतार यांना डॉ. कुंदन फेगडे यांच्या हस्ते देण्यात आले. या बक्षीस वितरण समारंभात पोलीस निरिक्षक रंगनाथ धारबळे, स्वामी पाटील, नगरसेवक उमेश फेगडे, योगेश चौधरी, यावल एसटी आगाराचे व्यवस्थापक दिलीप महाजन सह मान्यवरांची उपस्थिती होती.

## टँकर वेल्डिंग करताना स्फोट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पुणे** प्रतिनिधी

पुण्यात टँकर वेल्डिंग करताना स्फोट झाल्याची घटना घडली आहे. पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या माळी मळा परिसरात आज मंगळवारी सकाळी पेट्रोलजन्य टँकरच्या वेल्डिंगचे काम सुरू होते. या टँकरच्या टाकीत असलेल्या गॅसमुळे स्फोट झाल्याची घटना घडली. या स्फोटात भाजल्यामुळे एक कामगार गंभीर जखमी झालाय. या स्फोटातील गंभीर त्याच्यावर पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील लोणी काळभोर ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या माळी मळा परिसरातील भारत वेल्डिंग वर्क्स या वर्कशॉपमध्ये टँकरच्या दुरुस्तीचे काम सुरू होतं. टँकरचे दुरुस्तीचे काम सुरू असतानाच अचानक मोठा स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता मोठी होती. त्यामुळे दुकानाच्या पत्र्याचे शेड तुटून पत्रे बाजूला उडून पडले. या घटनेत चांद बाबू हा कामगार गंभीर भाजला झालाय. स्फोटानंतर कर्मचारी शेडखाली अडकला होता. जखमी झालेल्या कर्मचाऱ्याला बाहेर काढले. त्याला तातडीने रुग्णवाहिका बोलावून पुण्यातील रुग्णालयात उपचारासाठी पाठवलं. स्फोटात टँकरचे मोठे नुकसान झालं आहे. स्फोटाचा काही अंतरावरपर्यंत आवाज ऐकू गेला. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालं होतं. सुदैवाने या घटनेत कोणताही जीवितहानी झाली नाही. टँकरचा वापर पेट्रोल आणि डिझेल वाहतुकीसाठी केला जात होता. टाकीत उरलेल्या ज्वलनशील वायूंच्या साठ्यामुळे वेल्डिंगदरम्यान ठिणगी पडून स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

**CHANGE OF NAME**

MY OLD NAME IS : MEENAKSHI KASHINATH CHAUDHARI BUT I HAVE CHANGED MY NAME MY NEW NAME IS : MINAKSHI SANJAY KHADKE BOTH NAME'S ARE THE SAME PERSON JALGAON JALGAON 425001

**NAME CHANGE**

I have changed my name from "JAVED KHAN JAFAR KHAN" (Old name) To "JAVED KHA JAFAR KHA" (New name) as per documents for all purpose.

**NAME CHANGE**

I have changed my name from "SHABNAM AABID KHAN" (Old name) To "SHABNAM ABID KHAN" (New name) as per documents for all purpose.

**जाहिर नोटीस** — अ‍ॅड.पी.जी.शुक्ल

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव**

दि.कि.अर्ज नं.८३/२०२६
निशाणी ७
चौकशी तारीख २०/०६/२०२६

**अर्जदार :- १]** प्रमिलाबाई हरी मिस्तरी उ.व. ६७ धंदा शेती / मजुरी, रा. पिंपळगांव गोलाईत पोस्ट टाकळी ता. जामनेर जि. जळगाव [२] समीता बाळुभाई मिस्तरी, उ. व. ४६ धंदा घरकाम, रा. ९९ मंगलभाई खेटर, रेल्वे लाईन जवळ, सायाजीगुज, बडोदरा फतेपुरा,ग,ुजरात ३९०००६ [३] सुनीता राजु हिरे, उ. व. ३९ धंदा घरकाम, रा. २१ महादेव नगर, कोतर तलवाडी, अलबनाका,बडेदरा, मंजलपुरा गुजरात ३९००११ [४] अनिता रविंद खैरणार उ. व . ३९ धंदा घरकाम, रा. फ्ॅट नं. १४, चंपा समृध्दी अपार्टमेंअ, ऐ. टी.पवार आश्रम स्कुल, आदर्श नगर, बोरगड नाशिक ता. जि.नाशिक [५] योगिता किशोर मोरे, उ. व. ३५ धंदा घरकाम, रा. मारोती मंदिराच्या मागे, कोठारी नगर. पिंप्राळा जळगांव ता. जि. जळगांव [६] गजानन हरी शार्दुल, उ. व. ३५ धंदा घरकाम, रा. ग ट नं. १२९ /, हरी विठ्ठल नगर, पिंप्राळा शिवार बस स्टॉप समोर, जळगाव ता. जि. जळगांव ४२५००१

**//विरुध्द//**
कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- भारतीय वारस कायदा कलम ३७२ प्रमाणे वारस दाखला [Succession Certificate] मिळणेकरीता अर्ज...**

१] या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की,असे की, अर्जदार नं. १ ते ६ हे वर नमुद पत्यावरील कायमस्वरुपी रहीवाशी आहेत. अर्जदार नं. १ ही **मयत हरी सुकदेव मिस्तरी** यांची पत्नी आहे व अर्जदार नं. २ ते ६ हे अनुक्रमे मुले / मुली आहेत. **अर्जदाराचे पती / वडील नामे हरी सुकदेव मिस्तरी हे ता. २३/०१/२०२० रोजी निलकलम हॉस्पीटल जळगाव** येथे मयत झालेले आहे. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत या शिवाय अन्य वारस नाहीत. [२] अर्जदाराचे मयत **पती / वडील नामे हरी सुकदेव मिस्तरी** यांचे भारतीय स्टेट बॅक शाखा जामनेर ता. जामनेर जि. जळगाव येथे **बचत खाते क्र. ३६४००४७४५८३ यात** रक्कम इतकी रक्कम जमा आहे. सदर रक्कम अर्जदार यांना मिळणेसाठी अर्जदार हे **सदर बॅकेत ता. ०९/०४/२०२६ रोजी काढण्यासाठी गेले** असता बॅक व्यवस्थापकाने सदर रकमेसाठी मे. कोर्टातून वारस दाखला शिवाय रक्कम मिळणार नाही असे सांगितले. त्यामुळे **रक्कम रू.१५८४४.१७/- व त्यावरील पुढील व्याजासाठी** अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याने वारस दाखला [Succession Certificate ] मिळणेसाठी हा अर्ज करणे भाग झाले आहे.[३]असे की ,त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **मयत हरी सुकदेव मिस्तरी** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. २०/०६/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. हया जाहिरानाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबददलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **०५/०५/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

**सही/-** **क. लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक सह दिवाणी न्यायालय,क.स्तर जामनेर**

**जाहिर नोटीस** — अ‍ॅड.अे.आर.चंदेले

**जामनेर येथील सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामनेर यांचे कोर्टात जि. जळगाव**

दि.कि.अर्ज नं.७७/२०२६
निशाणी ७
चौकशी तारीख १६/०६/२०२६

**अर्जदार :- १]** प्रितेश हिरालाल भुरट उ. व. ३५ धंदा व्यापार [२] कल्पेश हिरालाल भुरट उ. व. ३१ धंदा व्यापार दोघे रा. मोयगांव ता. जामनेर जि. जळगांव [३] रुपाली सनी बोथरा उ. व. ३८ धंदा घरकाम, रा. घोटी ता इगतपुरी जि नाशिक

**//विरुध्द//**
कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे वारस दाखला मिळणेकरीता अर्ज...**

१] या कामी अर्जदारातर्फे मे. कोर्टात अर्ज असा की,असे की, अर्जदार हे वर नमुद पत्यावरील कायमचे रहिवाशी असून आजही ते वर नमुद पत्यावर राहतात.तसेच अर्जदार नं. १ व २ हे सख्खे भाउ असून अर्जदार नं. ३ ही अर्जदार नं. १ व २ यांची बहिण आहे. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा स्वर्गीय **हिरालाल मोतीलाल भुरट** यांचे वारस आहेत असा वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडील **नामे हिरालाल मोतीलाल भुरट हे तारीख ०५/०२/२०२६ रोजी मौजे जामनेर** ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेले आहे. तसेच **मयताची पत्नी व अर्जदाराची आई नामे लिलाबाई हिरालाल भुरट ता. ३०/०४/२०२१ रोजी मोयगांव ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेली असून मयत हिरालाल मोतीलाल भुरट यांची आई नामे सायराबाई मोतीलाल भुरट या ता. २०/०७/२०१० रोजी मोयगांव** ता. जामनेर जि. जळगांव येथे मयत झालेल्या आहे. त्यामुळे मयतास अर्जदारा व्यतीरिक्त अन्य कुणीही वारस नाही.[२]असे की,अर्जदार ही **स्वर्गीय हिरालाल मोतीलाल भुरट हे मयत झालेले असल्याने** अर्जदार यांना वारस दाखला शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता मयताचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याने तसा वारस दाखला **पोलीस पाटील यांचेकडे ता. १५/०४/२०२६ रोजी मागणी केली असता** त्यांनी सदरील वारस दाखला तुम्हास मे न्यायालयाकडून काढावा लागेल असे सांगितले म्हणून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने शासकीय व निमशासकीय कामकाजाकरीता वारस दाखला गरजेचा आहे.म्हणून अर्जदार हे **मयत हिरालाल मोतीलाल भुरट** यांचे कायदेशिर वारस असल्याने तसा वारस दाखला [ Legal hairship Certificate ] मिळणेसाठी अर्जदार यांना सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल करणे भाग झाले आहे.[३]असे की ,त्याअर्थी सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार हे **स्वर्गीय हिरालाल मोतीलाल भुरट** यांचे कायदेशीर वारस असून त्यांचे व्यतिरिक्त आणखी कोणी कायदेशीर वारस असल्यास योग्य तो पुरावा म्हणून दस्तऐवज व आपले लेखी म्हणणे देणेकामी स्वत: किंवा आपले वकीलांमार्फत **मे. कोर्टात दि. १६/०६/२०२६ रोजी प्रत्यक्ष** जाब देणेकामी व दस्तऐवज दाखल करणेकामी स्वत: हजर रहावे. हया जाहिरानाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे कायदेशीर वारस असल्याबददलचे सर्टिफिकेट देईल.आज दिनांक **२०/०४/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस दिले असे.

**सही/-** **क. लिपीक** | **कोर्टाचा शिक्का** | **हुकूमावरुन सही/- सहा.अधिक्षक सह दिवाणी न्यायालय,क.स्तर जामनेर**

**जाहिर नोटीस** — अ‍ॅड.आशीतोष रामप्रसाद चंदेले

**जामनेर येथील कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार साहेब यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज नं. /२०२६
पुढील चौकशी तारीख

**अर्जदार :- १]** देविदास कडू पाटील, उ. व. ६८ वर्षे धंदा शेती,रा. भराडी ता. जामनेर जि. जळगांव

**//विरुध्द//**
मा.ग्रामसेवक सो. ..... **गैरअर्जदार**
ग्रामपंचायत कार्यालय, भराडी ता. जामनेर जि. जळगाव

**अर्ज :- जन्म नोंदणी अधिनियम चे कलम १३ नुसार भागीरथीबाई कडू पाटील यांचे मृत्यूची नोंद होऊन मिळणेबाबत....**

सर्व संबंधितास जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे - **देविदास कडून पाटील** यांच्या बहिणीच्या मृत्यूची नोंद होवून मिळणेसाठी **अ‍ॅड. आशितोष रामप्रसाद चंदेले रा. जामनेर ता. जामनेर जि. जळगाव यांच्या मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार भागीरथीबाई कडू पाटील यांचा मृत्यू दिनांक २१/०५/२०१८ साली मौजे भराडी** ता. जामनेर जि. जळगाव येथे झालेला आहे. अर्जदार यांना त्याचे शासकीय व निमशासकीय तसेच कोर्ट कामासाठी त्यांच्या बहिणीच्या मृत्यू दाखल्याची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी मृत्यूचा दाखला हा गैरअर्जदार यांच्याकडे मागितला असता त्यांनी अर्जदार यांच्या बहीण नामे **भागीरथाबाई कडू पाटील यांचे मृत्यू नोंदीचे २१/०५/२०१८ चे दप्तर / अभिलेख तपासले असता अर्जदार याचे बहिणीच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदार यांचेकडे अढळ होत नाही असा दाखला दिनांक २५/०६/२०२५ रोजी दिला आहे.** अर्जदार यांनी त्यांना विनवण्या केल्यावरुन त्यांनी अर्जदार यांना सांगितले कि, त्यांच्या बहिणीची मृत्यूची नोंद होवून तसा मृत्यू दाखला मिळणेसाठी न्यायालयातून मृत्यूची नोंद करणेबाबत आदेश आणल्याशिवाय आम्हाला नोंद करता येणार नाही, असे सांगितले म्हणून अर्जदारास त्यांच्या बहिणीच्या मृत्यूची नोंद करणेबाबतचा आदेश होणेसाठी सदरचा अर्ज दाखल करणे भाग झाले आहे.त्याअथी ज्या कोणाला अर्जदार यांच्या सदरील किरकोळ अर्जाचे कामी अर्जदार यांची बहीण नामे **भगीरथीबाई कडू पाटील यांचा मृत्यू दिनांक २१/०५/२०१८ साली मौजे भराडी** ता. जामनेर जि. जळगाव येथे झालेला आहे. याबाबत आक्षेप हरकत असेल त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यापासून ३० दिवसांच्या आत किंवा **दिनांक २८/०५/२०२६ रोजी न्यायालयात** योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा तसेच सदर मुदतीत कोणतीही योग्य हरकत न घेतल्यास अर्जदार यांचे मागणी नुसार लगेच पुरावा घेवून अर्जदार याची मागणी शाबित झाल्यास अर्जदार यांच्या बहिणीच्या मृत्यूची नोंद गैरअर्जदार याचे दप्तरी / रेकॉर्डला घेण्यासाठी तसा आदेश देईल. अर्जदार यांना कायदेशीर रित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल.आज रोजी दिनांक **१८/०३/२०२६** रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

**आदेशावरुन**
**सही/-**
**तहसिलदार जामनेर**

**BRIEF TENDER NOTICE**

**NOTICE INVITING E-TENDER NO.1/2026-27**

Sarpanch/VDO/Gramsevak, Village Panchayat Dist. Jalgaon.(MS)as mention below invites online Item rate tender for Various Construction Material or percentage rate from registered suppliers or contractor in behalf of Dy.Chief Executive Officer (V.P.) Zilla Parishad, Jalgaon.

| Sr No | Village Panchayat | Name of Work | EMD | Tender Fee | Estimated Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Patonda | Constraction Of Cement Concrete Road At Patonda Ta Chalisgaon Dist Jalgaon | 4,999/- | 5,00/- | **4,99,890/-** |
| 2 | Patonda | Repairs To Two Anganwadi Bulding At Patonda Ta Chalisgaon Dist Jalgaon | 2,500/- | 3,00/- | **2,50,000/-** |
| 3 | Wadala Wadali | Repairs To Pazar Talav Under 15Fc At Wadala Wadali Tal chalisgaon Dist Jalgaon | 2,999/- | 3,00/- | 2,99,884/- |

**General Terms and Condition-**

1. The complete bidding process will be **online (E-tendering)**
   **All the notifications / Corrigendum and changes regarding this tender notice hereafter will be published online on website http://mahatenders.gov.in**
2. **Bidding document for work can be seen and downloaded from the website "http://mahatenders.gov.in" from 09:00 hours on Dt 06/05/2026 to Dt 13/05/2026 up to 17:00**
3. **The bid can be submitted in electronic format on the website "http://mahatenders.gov.in" for work " from 09:00 hours on Dt 06/05/2026 to Dt 13/05/2026 up to 17:00**
4. **Technical Bid will be opened for work on Dt 15/05/2026 at 17:00 hours on website http://mahatenders.gov.in" in the Office of the Village Panchayat respectively Dist. Jalgaon**
5. The guidelines to download the tender document and online submission of bids and Procedure of tender opening can be downloaded from website http://mahatenders.gov.in

ग्रा.पं.अधीकारी /सरपंच,
ग्रामपंचायत कार्यालय
जि जळगाव

लोकशाही दैनिक हे लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असून त्यांच्या वतीने मुद्रक आणि संपादक शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही ऑफसेट एम-१६९ , एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
Lokshahi Dainik is owned by Lokshahi Innovations Private Limited and is Printed by the Printer and Editor - Shanta Kamlakar Wani Publisher - Rajesh Kamlakar Yawalkar, at Lokshahi Offset M-169, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra) and published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra. आर.एन.आय.नं MAHMAR/2009/33028 पोस्टल रजी. नंबर No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८. संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

# फुले मार्केटमधील अतिक्रमणांवर आजपासून कारवाई

**महापौरांसह अधिकाऱ्यांनी केली पाहणी : पुतळा अतिक्रमणमुक्त करण्याचे निर्देश**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या महात्मा फुले मार्केट येथील व्यापारी असोसिएशनने मागील आठवड्यात महापौर दीपमाला काळे यांना निवेदन देऊन तेथील समस्यांविषयी अवगत केले होते. या पार्श्वभूमीवर, महापौर दीपमाला काळे यांनी मंगळवार दि. ५ मे रोजी दुपारी १२ वाजता फुले मार्केटला भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात महापौरांनी अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत कारवाईचे आदेश दिले.

या पाहणी दौऱ्यादरम्यान उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, स्वीकृत नगरसेवक तथा फुले मार्केट व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष रमेश मतानी, स्थायी समिती सदस्य अरविंद देशमुख, मनपा उपायुक्त पंकज गोसावी, सहाय्यक उपायुक्त उदय पाटील, विद्युत विभागाचे प्रमुख संदीप मोरे, अतिक्रमण विभागाचे




संजय ठाकूर, तसेच बांधकाम, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी आणि हॉकर्स असोसिएशनचे नंदू पाटील उपस्थित होते.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याभोवतीचे मोठे अतिक्रमण पाहून महापौर संतापल्या. सर्व पुतळे अतिक्रमणमुक्त करून त्यांनी श्वास घेतला पाहिजे, असे आदेश असतानाही येथे अतिक्रमण कसे? असा सवाल करत, तात्काळ उद्यापासून कारवाई करून पुतळा परिसर अतिक्रमणमुक्त करण्याचे आदेश त्यांनी दिले. सेंट्रल फुले मार्केट येथील अतिक्रमण काढण्याबाबत अधिकाऱ्यांना धारेवर धरत, तुमचे काहीच नियोजन नाही का? वेळ पडली तर पोलिस बंदोबस्त घेऊन अतिक्रमण काढा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. मार्केटमधील अनधिकृत वायरिंगचे कनेक्शन तात्काळ तोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार, बुधवारी सकाळी हे कनेक्शन तोडण्यात येऊन अवैधरित्या बांधलेल्या ताडपत्री व ग्रीन शेडनेटचे कापड काढले जाणार आहेत. तसेच मार्केटमधील रस्त्यावर असलेल्या जड-अवजड पेट्याही उचलल्या जातील. जो दुकानदार विनापरवाना हॉकर्सला जागा उपलब्ध करून देईल, त्याचा परवाना तात्काळ रद्द केला जाईल, असा इशारा महापौरांनी दिला. दरम्यान मार्केटमध्ये २०० ते ३०० हॉकर्स नोंदणीकृत असताना, प्रत्यक्षात त्यांची संख्या हजाराच्या आसपास गेल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. हॉकर्ससाठी पर्यायी जागा देणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# लोकशाही

## संपादकीय

## अतिक्रमांच्या विळख्यातून शहराची सुटका होईल का?



गेल्या पंधरा वर्षापासून जळगाव शहरातील महामार्गावरील अतिक्रमणे काढण्याची धडक मोहीम जळगाव महापालिकेत राबवली आहे. त्यात कालिंका माता मंदिर पासून ते अजिंठा चौफुली, इच्छा देवी चौक, आकाशवाणी चौक, खोटे नगर पर्यंत महामार्गावरील अतिक्रमणाचा सफाया केला. समांतर रस्त्यावर दोन्ही बाजूला चांगले पक्के अतिक्रमणे झाली होते. ती सर्व जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली. ही अतिक्रमणे तात्पुरती काढली नाही तर ती पूर्णपणे काढून जप्त करून त्यावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे आता पुन्हा नव्याने अतिक्रमण होण्याची संधी फार कमी आहे. रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणाचा सफाया झाला, परंतु आता शहरातील अतिक्रमणे काढणे हे काम उद्यापासून सुरू होणार आहे. शहरातील फुले मार्केट, बळीराम पेठ, चौबे मार्केट परिसर, सुभाष चौक परिसर, गोलाणी मार्केट येथील अतिक्रमणे काढणे मोठे जेकेरीचे आहे. फुले मार्केट मध्ये तर अतिक्रमणाचा इतका विळखा आहे की, तेथे ग्राहकांना रस्त्याने चालणे देखील मुश्किल होते. मुख्य दुकान कोणते आणि अतिक्रमण कोणते हे येथे समजतच नाही. त्यातच अतिक्रमणाचा विळखा पाहता वाट काढणे ग्राहकांना मुश्किल होते. ग्राहकांच्या समोर अनेक अडचणी उभ्या राहतात. ग्राहकांच्या पर्स, किमती वस्तू चोरीला जातात. त्याला जबाबदार कोण? फुले मार्केटमध्ये अतिक्रमण धारकांची मजुरी फार चालते. त्यामुळे ग्राहक अडचणीत सापडतो. फुले मार्केटमध्ये एकूण २३४ अतिक्रमण धारक हे रजिस्टर अतिक्रमणधारक आहेत. रजिस्टर अतिक्रमणधारकांना पर्यायी जागा देणे महापालिकेवर बंधनकारक आहे. जेथे जेथे अतिक्रमण झोन करण्यात आले आहे. तेथे अतिक्रमणधारक थांबत नाहीत. अतिक्रमण झोन सोडून दुसऱ्या ठिकाणी ते थांबतात. कारण त्यांचा व्यवसाय अतिक्रमण झोन मध्ये चालत नाही, म्हणून ते मुख्य ठिकाणी गर्दी करतात. त्यासाठी या रजिस्टर अतिक्रमणधारकांना वेगळ्या जागा मुकारर करण्याची गरज आहे. पण नवीन ठिकाणी जोपर्यंत ग्राहकांची वर्दळ होत नाही तोपर्यंत व्यवसाय चालत नाही. एकदा ग्राहकांची वर्दळ सुरू झाली की त्यांचा व्यवसाय आपोआप चांगला चालतो. त्याचे उत्तम उदाहरण आहे, ते खाऊ गल्लीचे. खाऊ गल्ली सुरुवातीला महानगरपालिकेच्या गल्लीत आणण्यात आली, तेव्हा ग्राहकांची वर्दळ कमी होती. पण एकदा तेथे सवय झाली की आज खाऊ गल्ली मध्ये गर्दी मावत नाही. तो ग्राहकांच्या सवयीचा भाग आहे. म्हणून अतिक्रमण झोन जेथे केले जाईल तेथे अतिक्रमण धारकांचा व्यवसाय जोमाने सुरू होईल यात शंका नाही. परंतु आज जी फुले मार्केट मधील अतिक्रमणे आहेत ती फार मोठी डोकेदुखी आहे. अनेक लोकनियुक्त महानगरपालिका सदस्यांनी पूर्ण प्रयत्न करूनही ते अतिक्रमण हटवण्यास ते असमर्थ ठरले आहेत. त्याचा दोष अतिक्रमण विभागाचाही आहे. अतिक्रमणाची गाडी सकाळी ११ ते १२ पर्यंत थांबली की त्यानंतर तेथून निघून जाते. या गाड्या गेल्या की पाच मिनिटात अतिक्रमणधारक तेथे आपला व्यवसाय थाटतात. हा ऊन सावलीचा खेळ चालू असतो. अतिक्रमण विभागाला अतिक्रमण धारकांकडून जो मलिदा मिळतो त्यामुळे अतिक्रमण विभाग त्याला कानाडोळा करतात ही वस्तुस्थिती आहे.

महापौर दीपमाला काळे यांची अतिक्रमण काढण्याबाबत स्वच्छ भूमिका आहे. त्यात त्यांना कितपत यश येते हे पाहायचे आहे. कसलीही भिडभाड न ठेवता दिपाली दीपमाला काळे या अतिक्रमण काढत आहेत. पण काही मोठ्यांचे अतिक्रमणाबाबतीत थोडा सॉफ्ट कॉर्नर ठेवला जातोय, तो ठेवता कामा नये. मोठे दुकानदारांनी आपल्या दुकानासमोर काही अतिक्रमण केले असेल तर ते तितक्यात ताकदीने काढण्याची हिंमत महापौरांनी ठेवली पाहिजे. लोक संघर्ष समितीच्या अध्यक्षा प्रतिभा शिंदे यांनी आरोप केला आहे की, स्वतःच्या पतीच्या नावावर असलेल्या इम्पेरियल हॉटेल येथे पार्किंगच्या जागेवर अतिक्रमण करून ती पार्किंगची जागा लग्न समारंभासाठी देण्यात येते. ते जर खरे असेल तर ते दीपमाला काळे यांनी काढले पाहिजे. ती त्यांची जबाबदारी आहे. प्रतिभा शिंदे म्हणतात इम्पेरियल हॉटेलचे अतिक्रमण काढण्यासाठी मी प्रशासनाला मुदत दिली आहे. त्या मुदतीच्या आत ते नाही काढले तर मी उपोषणाला बसणार आहे. काशिनाथ लॉज येथे झालेले अतिक्रमण देखील तातडीने काढावे, अन्यथा त्यासाठी मला उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल असे प्रतिभा शिंदे यांनी म्हटले आहे. अतिक्रमण काढण्याला आमचा विरोध नाही. अतिक्रमणे काढून शहर स्वच्छ केलेच पाहिजे. परंतु धनदांडग्यांची अतिक्रमण काढायचे नाही आणि ज्यांची रोजी रोटी अतिक्रमणावर आहे, त्यांना मात्र उघडे करायचे हे कसले तंत्र आहे? आम्ही हे चालू देणार नाही, असे प्रतिभा शिंदे यांचे म्हणणे आहे. त्यासाठी महापौर दीपमाला काळे यांच्यासमोर महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कसलाही भीडभाड न करता सर्वांचे अतिक्रमण काढणे हे होय..!

## आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांसाठी ‘स्नेहवन’कडून मोफत निवासी शिक्षण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** प्रतिनिधी

शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाच्या पुढाकारातून ‘आपुलकी’ प्रकल्प राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत पुणे येथील ‘स्नेहवन’ या सामाजिक संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना मोफत निवासी शिक्षण दिले जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांची नावे १० मे २०२६ पर्यंत प्रशासनाकडे सादर करण्याचे आवाहन रावेर तहसीलदार कार्यालयाकडून करण्यात आले आहे. या प्रकल्पाचा लाभ केवळ शेतकरी आत्महत्या केलेल्या कुटुंबातील मुलांनाच दिला जाणार आहे. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश दिला जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुण्याजवळील आळंदी येथील निवासी शाळेत मोफत शिक्षण, निवास व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना निर्देश देण्यात आले असून, ते संबंधित कुटुंबांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित करणार आहेत. अर्ज करताना पालकांचे संमतीपत्र जोडणे आवश्यक आहे. तालुक्यातील पात्र व गरजू कुटुंबांनी आपल्या परिसरातील तलाठी किंवा मंडळ अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अटलांटा प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करा!

**नगरसेवकांची पोलिस अधीक्षकांकडे मागणी**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील कोट्यवधी रुपयांच्या कथित आर्थिक गैरव्यवहाराशी संबंधित अटलांटा कन्स्ट्रक्शन कंपनी प्रकरण आता अधिकच गंभीर बनले आहे. या प्रकरणात आरोपींना अटकपूर्व जामीन मिळण्यापूर्वीच तात्काळ अटक करण्यात यावी अशी ठाम मागणी नगरसेवक अरविंद देशमुख यांनी पोलीस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहता, जळगाव महानगरपालिकेची मोठ्या प्रमाणावर आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप असून यापूर्वीच शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




करण्यात आला आहे. संबंधित कंपनीच्या संचालकांसह इतरांवरही गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

नगरसेवक देशमुख यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, या प्रकरणातील आरोपी अटकपूर्व जामीन मिळवण्याच्या हालचाली करत असल्याची माहिती मिळत आहे. जर त्यांना जामीन मिळाला, तर ते तपासात अडथळा निर्माण करू शकतात, तसेच पुरावे नष्ट करण्याचा किंवा साक्षीदारांवर दबाव टाकण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे तपासाची दिशा बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. जळगावकरांच्या करातून जमा झालेल्या पैशांचा प्रश्न असल्याने या प्रकरणात कठोर आणि तातडीची कारवाई होणे अत्यंत आवश्यक आहे, असे देशमुख यांनी ठामपणे सांगितले. आरोपींना त्वरित अटक करून तपास वेगाने आणि प्रभावीपणे पुढे न्यावा, तसेच जनतेचे कोट्यवधी रुपये वसूल करण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणात महापालिका प्रशासनाकडूनही अधिकृत फिर्याद नोंदवण्यात आली असल्याने प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. या संपूर्ण प्रकरणाकडे आता जळगावकरांचे लक्ष लागले असून पुढील कारवाई काय होते, याबाबत उत्सुकता वाढली आहे. यावेळी स्थायी समिती सभापती चंद्रशेखर पाटील, विजय जगताप यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच तपास यंत्रणेला आवश्यक ती सर्व मदत करण्यास आपण तयार असून जनहितासाठी हा लढा पुढेही सुरूच राहील, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.

## अवैध गौण खनिज वाहतूक; २ ट्रॅक्टर जप्त

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**रावेर** प्रतिनिधी

अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध रावेर प्रशासनाने आपली धडक मोहीम तीव्र केली आहे. आज दिनांक ५ मे २०२६ रोजी तहसीलदार दीपा जेधे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखालील पथकाने खिरवड ते पातोंडी फाट्यादरम्यान मोठी कारवाई करत अवैध वाळू/गौण खनिज वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर पकडले आहेत. तहसीलदार दीपा जेधे यांना खिरवड ते पातोंडी फाटा या मार्गावरून गौण खनिजाची



अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे जेधे यांनी स्वतः पथकासह सापळा रचला. या कारवाईदरम्यान विनापरवाना गौण खनिज वाहून नेणारे दोन ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले असून, ते जप्त करून तहसील कार्यालय रावेरच्या आवारात जमा करण्यात आले आहेत. जप्त करण्यात आलेल्या २ ट्रॅक्टरवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई तहसीलदार दीपा जेधे यांच्या मार्गदर्शनात अविनाश इंगोले, नागसेन इंगळे, भूषण कांबळे, रवी शिंगणे या पथकाने केली.

## कचरा डेपोचे काम चार महिन्यात होणार पुर्ण!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

कचरा डेपोचे काम चार महिन्यात पुर्ण होणार असून इतर सर्व कामे सहा महिन्यात पुर्ण होवून शहरातील निघणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे., अशी माहिती महापालिकेचे उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिली. उपमहापौर मनोज चौधरी यांनी मंगळवारी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची आढावा बैठक घेतली. या बैठकीत मनपाचे अधिकारी प्रकाश पाटील यांच्यासह मक्तेदार श्रीश्री इन्फ्रास्ट्रक्चरचे आदित्य खटोड व रॉयलर्स वेस्टर्न,पुणेचे



विशाल पाटील उपस्थित होते. कोणकोणते काम किती किती महिन्यात पुर्ण होईल, याबाबत उपमहापौरांनी दोन्ही मक्तेदारांना विचारणा केली असता कचरा डेपोचे काम ३ ते ४ महिन्यात पुर्ण होईल, असे खटोड यांनी सांगितले तर, मशिनरीचे काम ६ महिन्यात पुर्ण होईल, असे विशाल पाटील यांनी सांगितले. त्यामुळे सहा सर्व कामपुर्ण होऊन प्रकल्प कार्यान्वीत केला जाणार असून कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. दोन्ही मक्तेदारांना कामाचा वेग कायम ठेवण्याच्या सूचना दिल्या असून लवकरात लवकर कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम सुरु होईल, अशा पध्दतीने नियोजन करण्याचे निर्देश उपमहापौर मनोज चौधरी यांनी दिले आहे.

## जिद्द, चिकाटी आणि संघर्षातून किरणने मिळवले यश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी

तालुक्यातील घोसला येथील रहिवासी किरण कैलास माळी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मुंबई महाराष्ट्र पोलीस दलात निवड मिळवली असून गावात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. किरण यांचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या साधारण असले तरी त्यांच्या आई-वडिलांनी मुलाच्या शिक्षणासाठी अपार कष्ट घेतले. वडील अल्पभूधारक शेतकरी तर आईने शेतात राबत घराचा गाडा



ओढला. डोंगरदऱ्यातील अल्प शेती असूनही परिस्थितीसमोर हार न मानता त्यांनी शेती जमीन गहाण ठेवून मुलाच्या शिक्षणासाठी आर्थिक व्यवस्था केली. मुलगा शिकून मोठा व्हावा, हीच त्यांची एकमेव जिद्द होती. आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवत किरण यांनी शिक्षणासोबतच स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू ठेवली. अनेक अडचणी, आर्थिक संकटे आणि मर्यादा असूनही त्यांनी कधीही हार मानली नाही. दिवस-रात्र मेहनत, सातत्य आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा याच्या जोरावर त्यांनी पोलिस भरतीत यश संपादन केले. अखेर त्यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आणि त्यांची मुंबई महाराष्ट्र पोलीस दलात निवड झाली. या यशामुळे त्यांच्या कुटुंबियांसह संपूर्ण घोसला गावात आनंद आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. किरण माळी यांचे यश हे ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर कोणतेही ध्येय साध्य करता येते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे.

## कट्ट्यासह युवक अटकेत

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

एरंडोल तालुक्यातील ताडे येथे आयोजित हळदी समारंभात गावठी कट्टा घेऊन फिरणाऱ्या युवकाला पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केली आहे. आरोपीकडून एक गावठी कट्टा व जिवंत काडतूस जप्त करण्यात आले असून या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. ३ मे रोजी ताडे येथे हळदी समारंभाचा कार्यक्रम पार पडत असताना लखन प्रकाश वाघ (रा. पथराडे, ता. पाचोरा) हा युवक कार्यक्रमात उपस्थित होता. रात्री उशिरा बँडवर नाचताना काही नागरिकांच्या नजरेस त्याच्या कमरेला गावठी कट्टा दिसून आला. याबाबत विचारणा होताच आरोपीने गर्दीचा फायदा घेत घटनास्थळावरून पलायन केले. या प्रकाराची माहिती तत्काळ कासोदा पोलीस ठाण्याला देण्यात आली. घटनेनंतर पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे ४ मे रोजी आरोपी पुन्हा ताडे गावात संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती मिळाली. यानुसार पोलिसांनी सापळा रचून भातखेडे चौफुली परिसरातून आरोपी लखन वाघ याला ताब्यात घेतले. अंगझडतीदरम्यान त्याच्याकडून गावठी कट्टा आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

# बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गाच्या मोजणीचा सावळा गोंधळ!

**शेतकरी मात्र वाऱ्यावर : कागदी घोडे नाचवण्यात अधिकारी मग्न**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धानोरा, ता. चोपडा** प्रतिनिधी

तीन राज्यांना जोडणाऱ्या आणि केंद्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या बऱ्हाणपूर-अंकलेश्वर महामार्गाच्या चौपदरीकरणाने सध्या प्रशासकीय सर्कस सुरू केली आहे. एकीकडे कोट्यवधींच्या निधीच्या गप्पा मारल्या जात असताना, दुसरीकडे भूमी अभिलेख आणि इतर संबंधित विभागांमध्ये साधे सामंजस्य नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या गोंधळामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, हा प्रकल्प नक्की कोणासाठी? असा प्रश्न विचारला जात आहे.

भूमी अभिलेख विभाग म्हणतोय मोजणी होणार नाही, तर इतर विभाग आम्हाला काहीच माहीत नाही असे सांगून हात झटकत आहेत. केंद्राचा एवढा मोठा प्रकल्प असताना विभागांमध्ये संयुक्त मोजणीबाबत ताळमेळ नसणे, हे प्रशासनाचे दिवाळखोरपण सिद्ध करत आहे. दिलेल्या वेळापत्रकानुसार अडावद परिसरात मोजणी होणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात जमिनीवर अधिकारी फिरकलेच नाहीत. प्रशासनाचे नियोजन फक्त कागदावरच मर्यादित आहे का?, मोजणीसाठी शेअर केलेल्या पीडीएफ यादीत आणि प्रत्यक्ष जागेवरील नावांमध्ये कोणताही ताळमेळ नाही. ज्या परिसरात मोजणी सुरू आहे, तिथे दुसऱ्याच गावच्या शेतकऱ्यांची नावे असल्याने हा सावळा गोंधळ नेमका कोणाच्या सोयीसाठी घातला जात आहे? शेतकऱ्यांना प्रत्यक्ष पोस्टल नोटीस देण्याऐवजी फक्त व्हाट्सअप ग्रुपवर नोटीसा फिरवल्या जात आहेत. विशेष म्हणजे, या नोटीसाही वारंवार रद्द केल्या जात असल्याने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत होत आहे. मोजणीचा पत्ता नाही, शेतकऱ्यांना नोटीस नाही, तरीही वर्तमानपत्रांतून पर्यायी वाहतूक वळवण्याच्या

> प्रशासनाचा हा पोरखेळ आम्ही थांबवणार आहोत. व्हाट्सअपवर नोटीस पाठवून जमिनी बळकावता येणार नाहीत. जोपर्यंत प्रत्यक्ष लेखी नोटीस मिळत नाही आणि आमचा सातबारा स्पष्ट होत नाही, तोपर्यंत एक इंचही मोजणी होऊ देणार नाही.
>
> **– सुरेश सोनवणे**
> **संतप्त शेतकरी, धानोरा**

बातम्या येत आहेत. जमीन ताब्यात घेण्याआधीच रस्ते बंद करण्याची तयारी करणे, ही कसली घाई? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ही मोजणी केवळ भूमी अभिलेख मार्फत आहे की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासोबत संयुक्तपणे आहे, हे समजायला कोणताही मार्ग उरलेला नाही. नियमानुसार मोजणीच्या वेळी सर्व विभागांचे अधिकारी आणि शेतकरी उपस्थित असणे अनिवार्य आहे, मात्र येथे कायद्याची पायमल्ली होताना दिसत आहे.





# दगडावरील कलाकृतीचे अनोखे शिल्प

दगडातून मूर्ती घडवण्यासाठी शिल्पकाराला त्यावर अनेक छन्नी, हातोड्यांचे घाव घालावे लागतात. मात्र, आपल्या आसपास आढळणाऱ्या दगडांच्या मूळ आकारात कोणताही बदल न करता त्यावर विविध रंगांची उधळण करून व्यक्तिचित्रे, निसर्गचित्रे साकारण्याची आणि त्या दगडांना जिवंत करण्याची किमया कणकवलीच्या सुमन दाभोळकर या कला शिक्षकाने साधली आहे. लॉकडाऊनमध्ये फावल्या वेळेत सुमन यांना स्टोन आर्टचा छंद जडला असून, आजवर त्यांनी दगडावर ५० हून अधिक कलाकृती तयार केल्या आहेत.

स्टोन आर्ट ही कला वेगळी आहे. सोशल मीडियावर सुमन यांच्या अनेक कलाकृती व्हायरल होत आहेत. अनेक जण त्यांच्याकडून दगडांवर स्वतःचे पोट्रेट तयार करून घेत आहेत. तुम्हाला कलाकृतींसाठी नेमके दगड कोठून मिळते, तुम्ही दगडाच्या आकारात बदल करता का? असे प्रश्न त्यांना विचारले जातात. त्यावर दगड शोधताना नजर ही



फार महत्त्वाची असल्याचे ते सांगतात. दगडांना विशिष्ट आकार देऊन शिल्पकार कलाकृती घडवतात. मात्र, स्टोन आर्ट ही कला त्यापेक्षा वेगळी आहे. सध्या रस्त्यातील प्रत्येक दगडात मला विशिष्ट आकार दिसतात, असे सुमन यांनी सांगितले.

गेल्या दोन वर्षापासून ते ठाण्यातील न्यू हॉरिझॉन स्कॉलर्स स्कूलमध्ये आर्ट टीचर म्हणून काम पाहतात. दगडांवर कलाकृती साकारण्याची कल्पना कशी सुचली, यावर ते म्हणाले, लॉकडाऊमुळे मी बऱ्याच वर्षांनी गावी निवांत राहिलो. आमच्या घरापासून हाकेच्या अंतरावरच नदी आहे. नदीवर गेलो असता विशाल खडक माझ्यातील कलाकाराला खुणावू लागले. त्या विशाल खडकांतून मला निरनिराळे आकार दिसले. मग ते आकार प्रत्यक्षात आणण्यासाठी माझ्यातील कलेची मदत झाली. सुरुवातीला गंमत म्हणून मी दगडांवर काही पोट्रेट तयार केले. त्यात मला आनंद मिळत गेला आणि निरनिराळ्या कलाकृती घडत गेल्या. सुमन यांनी दगडावर आतापर्यंत आईनस्टाईन, सचिन तेंडुलकर, नसिरुद्दीन शहा, महेंद्रसिंह धोनी, सोनू सूद आदींचे पोट्रेट साकारले आहेत. शिवाय मासा, मांजर, कुत्रा, कासव, वडापाव या कलाकृतीही साकारल्या आहेत.

# धुलाई यंत्र

वॉशिंग मशिनचा शोध हा मानवी श्रमाची बचत आणि तंत्रज्ञानातील प्रगतीचे एक उत्तम उदाहरण आहे. कपडे धुण्याचे कष्टाचे काम सोपे करण्यासाठी या यंत्राचा शोध लागला. याच्या शोधाचा इतिहास खालीलप्रमाणे आहे वॉशिंग मशिनच्या संकल्पनेतील पहिले इंग्रजी पेटंट १६९१ मध्ये जारी करण्यात आले होते, परंतु ती अत्यंत प्राथमिक स्वरूपाची यंत्रे होती. अनेक दशके, फिरवण्यायोग्य ड्रम किंवा हँडल असलेली यंत्रे विकसित केली गेली, ज्यामध्ये कपडे आणि पाणी हाताने फिरवावे लागत असे.२० व्या शतकाच्या सुरुवातीला, १९०४ च्या सुमारास, वृत्तपत्रांमध्ये इलेक्ट्रिक वॉशिंग मशिन्सच्या जाहिराती दिसू लागल्या, ज्यामुळे मॅन्युअल कामातून सुटका झाली. १९३७ मध्ये पहिले स्वयंचलित वॉशिंग मशीन लॉंच करण्यात आले, ज्याने कपडे धुण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली. पूर्वी कपडे हाताने धुण्यासाठी दिवसभर काम करावे लागत असे. या कष्टाचे काम वाचवण्यासाठी यंत्राची गरज भासली. सुरवातीला लाकडी पिंप वापरून त्यात कपडे आणि गरम पाणी टाकून



ते फिरवले जात असे. यामुळे कपड्यातील घाण निघण्यास मदत होई. कालांतराने, या मशिन्समध्ये इलेक्ट्रिक मोटर्स, टाइमर, आणि पाणी गरम करण्याची सुविधा जोडली गेली. आधुनिक वॉशर्स आता कपडे धुणे स्वच्छ धुणे आणि पाणी पिळणे या सर्व प्रक्रिया एकाच ड्रममध्ये आपोआप करतात. थोडक्यात, वॉशिंग मशीनचा शोध हा कष्टाच्या कामातून मानवाला मुक्त करण्यासाठी आणि वेळ वाचवण्यासाठी लागलेला एक अत्यंत महत्त्वाचा शोध आहे



संकलन संयोजन

सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# उसने पैसे मागितल्याच्या रागातून तरुणाला धमकी व मारहाण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

आर्थिक व्यवहारातून झालेल्या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाल्याची धक्कादायक घटना चाळीसगाव तालुक्यातील पिंपरखेड येथे घडली आहे. उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून एका २२ वर्षीय तरुण शेतकऱ्याला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी चाळीसगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. चाळीसगाव तालुक्यातील पिंपरखेड येथील रहिवासी अविनाश शरद अहिरे (वय २२) याने संशयित आरोपी सचिन धोंडू अहिरे याला ऊस तोडीच्या कामासाठी आणि घरगुती कारणासाठी काही रक्कम उसने म्हणून दिली होती. ३० एप्रिल रोजी संध्याकाळी ७ वाजेच्या सुमारास इंदिरा नगर परिसरात अविनाशने सचिन अहिरे याच्याकडे आपल्या हक्काचे पैसे परत मागितले. मात्र, पैसे देण्याऐवजी सचिनने वाद घालण्यास सुरुवात केली.

# यामाहा फॅसिनोची नवी डिझाइन

इंडिया यामाहा मोटर प्रा. लि. ने स्टायलिश फॅसिनो १२५ एफआय हायब्रीडच्या डिझाइनमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा जाहीर केली, ज्यामुळे आजच्या तरुण आणि स्टाईल-सजग ग्राहकांच्या बदलत्या पसंती पूर्ण करण्याची यामाहाची वचनबद्धता अधिक दृढ झाली आहे. आधुनिक जीवनशैली आणि फॅशनच्या आवडीनिवडी प्रतिबिंबित करण्यासाठी डिझाइन केलेल्या, नवीन फॅसिनोमध्ये एक कॉम्पॅक्ट आणि अधिक समकालीन सिल्हूट आहे, जे तरुण पिढीला खूप आकर्षित करते. नवीनतम स्कूटर आता पूर्वीपेक्षा अधिक ट्रेंडी आहे, आणि तिच्या कमी केलेल्या मागील लांबीमुळे ती अधिक चपळ दिसते, ज्यामुळे शहरी वातावरणात ती सहजपणे चालवता येते. अपडेटेड फॅसिनोचे मुख्य वैशिष्ट्य तिच्या मागील डिझाइनमध्ये आहे, जे आधुनिक सौंदर्यदृष्टीला आकर्षित करण्यासाठी विचारपूर्वक पुन्हा डिझाइन केले गेले आहे. नव्याने कोरलेला मागील भाग, तसेच पुन्हा डिझाइन केलेले टेललाइट्स, फ्लॅशर्स आणि वैशिष्ट्यपूर्ण -आयकॉनिक टेललाइट डिझाइन, या स्टाईल-फर्स्ट स्कूटरला एक अत्याधुनिक, प्रीमियम आणि दृश्यात्मकदृष्ट्या संतुलित मागील प्रोफाइल देते. कार्यक्षमता आणि परिणामकारकतेच्या बाबतीत फॅसिनोचा डीएनए कायम ठेवत, अधिक परिष्कृत आणि समकालीन स्टायलिंग व्यक्त करण्यासाठी डिझाइनमध्ये आणखी सुधारणा करण्यात आली आहे, ज्यामुळे ती गतिमान असताना आणि थांबलेली असताना दोन्ही वेळी उठून दिसते. यामाहा फॅसिनोची नवी डिझाइन

# शेतात लावलेली ट्रॅक्टर ट्रॉली चोरी : गुन्हा दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भडगाव** प्रतिनिधी

शहरातील पाचोरा रस्त्यावरील क्रीडा संकुल समोरील शेतात लावलेली लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत भडगाव पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदर शेतकऱ्यांमध्ये शेती अवजारे चोरी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांचा बंदोबस्त त्वरित करावा अशी मागणी होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी- गणेश भरतसींग परदेशी रा. महालक्ष्मी कॉलनी भडगाव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २५/४/२०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास मी माझे पाचोरा रस्त्या शेताची पाहाणी करण्या साठी गेलो असता तेव्हा शेतातील गट न. २३६च्या विहीरी जवळ ट्रोली लावलेली होती दुस-या दिवशी मी शेतात गेलो असता माझी ट्रोली लावलेल्या ठिकाणी मला दिसली नाही. म्हणून ट्रॉली बाबत आजु बाजुच्या शेतकरी व आजु बाजुच्या परिसरात ट्रॉलीच्या शोध घेतला असता ती मिळुन आली नाही म्हणुन मला खात्री झाली कि, जैन ट्रेलर कंपनीची ट्रॉली कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली.८०,००० रु कि ची लाल रंगाची जैन कंपनीची ट्रेलर ची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली वरील वर्णनाची व किमतीची लाल रंगाची जैन कंपनीची ट्रेलरची लाल रंगाची ट्रॅक्टर ट्रोली ही माझे पाचोरा रोड लगत असलेले टोणगाव शिवारातील शासकीय क्रिडा संकुल समोर शेत गट क्र.२३६ मधुन कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी फिर्यादीची संमती वाचुन लबाडीच्या ईराद्याने चोरुन नेली आहे. म्हणुन अज्ञात चोरट्यांविरुद्ध भडगाव पोलिस स्टेशनला भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३, कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास भडगाव पोलिस करत आहे.

# गिरड जवाहर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भातखंडे** प्रतिनिधी

जवाहर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय गिरड शाळेचा इयत्ता बारावीचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ८८.८६% निकाल लागला आहे. शाळेचा एकूण निकाल ९३.४८% लागला आहे. कला शाखेतून जया गजानन कोळी, ७४.६७ %, द्वितीय रेशमा लहू भिल ७१.१७ %, स्वाती गोपाल कोळी ६६%, कोमल भाईदास शिरसाट ६६%, भाग्यश्री राजेंद्र चौधरी ६५.९५%, पाचवी कविता संजय बिर्हाडे ६४.८३ % ने उत्तीर्ण झाले आहेत. तर विज्ञान शाखेतून सिद्धी दिनेश भोसले ८२%, पर्व पवन अग्रवाल ८०.६७%, दिपाली गुणवंत पाटील ७८.६७, ऋषिकेश सुनील हटकर ७८.६७%, दिशीका धर्मेश अग्रवाल ७८.१७% मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन प्रतापराव हरी पाटील, उपाध्यक्ष डॉ. पूनम पाटील, सचिव प्रशांतराव पाटील, प्राचार्य एस पी पाटील, उपमुख्याध्यापक एस बी भोसले, ज्यूनीयर कॉलेजचे कार्यवाह यु वाय पाटील, शालेय समितीचे अध्यक्ष शिवाजीराव पाटील व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बंधूंनी अभिनंदन केले आहे

# जळगावात कोळी जमातीचा सामूहिक विवाह सोहळा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यातील आदिवासी कोळी लोकांच्या विवाहेच्छुंक उपवर-वधूंसाठी सालाबादप्रमाणे ह्यावर्षीही कोळी समाज बहुउद्देशीय प्रतिष्ठानच्या वतीने ११ मे २०२६ रोजी जळगाव येथील सरदार वल्लभभाई पटेल मंगल कार्यालय येथे मोफत सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. याबाबत नुकतीच प्रतिष्ठानची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जळगावचे माजी नगराध्यक्ष चत्रभुज सोनवणे व मार्गदर्शक जगन्नाथ बाविस्कर (संपर्कप्रमुख - कोळी मंडळ,चोपडा) यांची उपस्थिती होती. मागील तीन वर्षांपासून दरवर्षी मे महिन्यात हा सामूहिक विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात व उत्साहात संपन्न होत असतो.

याआधी पन्नास पेक्षाही जास्त उपवर वधूंचे विवाह प्रतिष्ठानतर्फे मोफत लावण्यात आलेले आहेत. सर्व स्तरातील दानशूर व्यक्ती व संस्था संघटनांच्या सहकार्याने हा विवाह सोहळा संपन्न होत असतो. यासाठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी चार सहा महिन्यांपासून अहोरात्र मेहनत घेत असतात. ह्या विवाह सोहळ्यात सर्व स्तरातील सामाजिक राजकीय नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शासकीय निमशासकीय अधिकारी, कर्मचारी, समाजसेवक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती असते. विवाह नोंदणीसाठी वधू-वरांचे लिव्हिंग सर्टिफिकेट, आधार कार्ड, पासपोर्ट फोटो व दोन्ही परिवारांचे संमती पत्र आवश्यक असते. वधू-वरांना लग्नड्रेस, बूट-चप्पलसह संसारोपयोगी वस्तू भेट देण्यात येतात. वधू-वरांची एकत्र वरात व भव्य शोभायात्रा मिरवणूक काढण्यात येते. लग्न सोहळा शुभमुहूर्तावरच लावण्यात येतो. लग्नप्रसंगी भव्य स्टेज, गेट, मंडप, व्यासपीठ, वाजंत्री, भोजन व इतर आवश्यक सुविधा पुरविण्यात येतात. यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवी कोळी, उपाध्यक्ष संजय बाविस्कर, सचिव अनिल कोळी, जेष्ठ सल्लागार गोकुळ सूर्यवंशी, संघटक आनंद सपकाळे, सहसचिव अक्षय सोनवणे, खजिनदार सुधाकर बाविस्कर, सहखजिनदार दीपक कोळी, प्रचार व प्रसिद्धी प्रमुख प्रा. भाऊसाहेब सोनवणे, गणेश बाविस्कर, सदस्य भिकन नन्नवरे, शिवाजी सूर्यवंशी, रतन बिऱ्हाडे, सतीश कोळी फौजी, नरेंद्र सपकाळे, निश्चलदास साळुंखे हे विशेष प्रयत्न करित आहेत

# गावाला शाळेचा अभिमान : रावसाहेब पाटील

## निपाणे शाळेत वार्षिक अंकाचे प्रकाशन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चाळीसगाव** प्रतिनिधी

शाळेमुळे गावाच्या विकासात अनमोल योगदान भावी पिढी च्या माध्यमातून होत असते. ती पिढी घडविण्याचे पवित्र कार्य शाळेतून शिक्षक वृंद करतात.त्यामुळे गावाला शाळेचा अभिमान असल्याचे वार्षिक अंक प्रकाशन वेळी माजी जि प सदस्य रावसाहेब पाटील यांनी आपले विचार व्यक्त केलेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निपाणे येथे दिनांक १ मे २०२६ शुक्रवार रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळेतील (वार्षिक अंक) तथा उपक्रम पुस्तिकेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गावातील माजी जिल्हा परिषद सदस्य रावसाहेब जिभाऊ तथा मनोहर गिरधर पाटील, शालेय समितीचे अध्यक्ष शरद पाटील, माजी सरपंच रोशन पाटील , संजय पाटील, शालिक पाटील, वाल्मिक पाटील, रामलाल पाटील, त्रंबक पाटील, प्रवीण पाटील, कौतिक पाटील, रणजित पाटील, बालू पाटील, सुदाम पाटील, आदि गावातील मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. हा वार्षिक अंक शाळेच्या उपक्रमशिल मुख्याध्यापिका सारिका नावरकर यांच्या सृजनशील कल्पनेतून साकार करण्यात आला आहे. यावेळी रावसाहेब पाटील यांनी शाळेच्या विकासाकरिता सर्व मदत करण्याचे आश्वासन देऊन वार्षिक अंकाचे कौतुक केले. मुख्याध्यापिका सारिका नावरकर यांनी वार्षिक अंकाचे महत्व सांगितले तसेच आगामी काळात शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याविषयी माहिती दिली. विद्यालयात मागील महिन्यात विविध



स्पर्धा घेतल्यात. यामध्ये नेत्रदीपक यश मिळविलेल्या विद्यार्थी, शिक्षक तसेच आगामी वर्षी राबिल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यात आली आहे. तसेच विविध शैक्षणिक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचे फोटो डॉक्युमेंट तयार करण्यात आलेले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२६ -२०२७ मध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टिकोनातून शाळेत कोणकोणते गुणवत्तापूर्ण उपक्रम घेतले जाणार आहेत. याची माहिती देखील या उपक्रम पुस्तिकेत तथा वार्षिक अंकात देण्यात आलेली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उषा शिंदे यांनी केले. प्रभावी सूत्रसंचालन देविदास पाटील तर आभार संदीप बिरारी यांनी मानलेत. प्रमुख अतिथी यांचा परिचय शांताराम पाटील यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ शिक्षक गोविंद पाटील, राजेंद्र पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंदानी परिश्रम घेतलेत. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी उपस्तीत होते.

# मुख्यमंत्री शेत पाणंद रस्ता कामाचा आ. किशोर पाटीलांच्या हस्ते शुभारंभ

## जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची प्रमुख उपस्थिती : शेतकऱ्यांचा शेत रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**लासगाव ता. पाचोरा** प्रतिनिधी

पाचोरा तालुक्यातील पहाण येथे मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजनेअंतर्गत रस्ता कामाचा भव्य भूमिपूजन सोहळा आज (१ मे) महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून उत्साहात संपन्न झाला. पाचोरा-भडगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार किशोर आप्पा पाटील यांच्या हस्ते आणि जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करीष्मा नायर, प्रांताधिकारी भुषण अहिरे, तहसिलदार विजय बनसोडे, गटविकास अधिकारी श्री मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत या कामाचे श्रीफळ वाढवून अधिकृत शुभारंभ करण्यात आला. पहाण येथील जिल्हा परिषद शाळेपासून ते नामदेव रामचंद्र पाटील यांच्या शेतापर्यंतच्या या पाणंद रस्त्यासाठी प्रशासकीय आणि तांत्रिक मंजुरी मिळाल्यानंतर आज




प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. राज्य शासनाकडून उपलब्ध निधीतून श्री शीतल ग्रुप या कंत्राटदारामार्फत हे काम पूर्ण केले जाणार आहे. शेतकऱ्यांना मोठा दिलासा: उद्घाटन प्रसंगी बोलताना आमदार किशोर आप्पा पाटील म्हणाले की, ''शेतकऱ्यांना पावसाळ्यात शेतात जाण्यासाठी कच्च्या रस्त्यांमुळे मोठा त्रास सहन करावा लागत होता. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजनेमुळे आता शेतमाल वाहतूक सुलभ होईल आणि शेतकऱ्यांची वर्षानुवर्षांची अडचण दूर होईल.'' जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनीही या उपक्रमाचे कौतुक करत वेळेत आणि दर्जेदार काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या सोहळ्याप्रसंगी उपविभागीय अधिकारी भूषण अहिरे, तहसील प्रशासनातील अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि पहाण परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा रस्ता मार्गी लागत असल्याबद्दल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला आहे.

# सीइओ करिष्मा नायर यांची ऐनपूर आरोग्य केंद्रास भेट




**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**ऐनपूर ता. रावेर** प्रतिनिधी

ऐनपूर येथील आरोग्य केंद्रास दि.५ मे रोजी जिल्हा परिषद सीइओ नायर यांनी अचानक भेट दिली. रावेर तालुक्यातील ऐनपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रास जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांनी दि.५ मे रोजी अचानक भेट दिली. त्याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैदकिय अधिकारी डॉ. प्रदीप लासूरकर व डॉ नितीन परदेशी यांनी त्यांचे स्वागत केले. सीइओ नायर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची पाहणी करत समाधान व्यक्त करुण प्राथमिक आरोग्य केंद्राचा कामाचा उचांक अधिक कसा वाढेल याबाबत सूचना केल्या. त्याप्रसंगी आरोग्य केंद्रातील कर्मचारी वर्ग उपस्थिती होता.

## सुकळी विद्यालयाची तनुष्का वाघ जिल्ह्यात दहावी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी



तालुक्यातील सुकळी येथील नवीन माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी ची विद्यार्थिनी कुमारी तनिष्का सुनील वाघने नुकत्याच झालेल्या एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये अनुसूचित जाती (एससी) विभागातून जिल्ह्यातून दहावा क्रमांक मिळवला. त्याबद्दल कु. तनिष्का सुनिल वाघ हिचे संस्थेचे सचिव डॉ. दिलीप पानपाटील तसेच मुख्याध्यापक प्रदीप दाणे आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून सत्कार व अभिनंदन करण्यात आले.

## महत्वाचे

### बंद घर फोडले ऐवज लंपास

**जळगाव–** जळगाव तालुक्यातील शिरसोली प्र.बो. येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे पाच लाख रुपये किमतीचा सोन्या–चांदीचा ऐवज आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी शिक्षक कॉलनीतील स्टॅम्प वेंडर राजेंद्र दौलत आंबटकर (बारी) यांच्या घरात झाली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्टॅम्प वेंडर राजेंद्र आंबटकर हे पत्नीसह गेल्या शुक्रवारी (१ मे) पुणे येथे गेले होते. दरम्यान, त्यांचे घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी–कोयंडा कापून आत प्रवेश केला. आज मंगळवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास आंबटकर कुटुंब घरी परतले असता, त्यांना दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले, तेव्हा चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान चोरट्यांनी घरातील धान्याच्या कोठीत लपवून ठेवलेले दागिने शोधून काढले. यात दोन तोळ्यांची सोन्याची मंगलपोत दीड तोळ्याची सोन्याची चेन ५ ग्रॅमचे सोन्याचे झुमके १५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण अंदाजे ५ लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून एमआयडीसी पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तपासाला गती देण्यासाठी 'चॅम्प' या श्वान पथकाला पाचारण केले होते. तसेच ठसे तज्ज्ञ यांनी घटनास्थळावरून फिंगरप्रिंट्स घेतले आहेत.

### शेतातील केबल चोरी सव्वा लाखांचे नुकसान

**भडगाव –** तालुक्यातील वडजी शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील विहिरीवर बसवलेल्या मोटरच्या इलेक्ट्रिक केबलसची चोरी करून तब्बल १ लाख १८ हजार ८४० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी राजेंद्रकुमार जयराम मोरे (वय ५१, रा. वडजी, ता. भडगाव, जि. जळगाव) यांच्या शेतातील विहिरीवर बसवलेल्या मोटरची केबल अज्ञात चोरट्यांनी कापून नेली. ही घटना दि. ३ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. चोरट्यांनी विविध शेतकऱ्यांच्या मोटारींना जोडलेल्या केबल्स कापून नेल्याचे समोर आले असून, एकूण १९ वेगवेगळ्या केबल्सचा समावेश आहे. या सर्व केबल्सची एकत्रित किंमत १,१८,८४० रुपये इतकी आहे. या प्रकरणी भडगाव पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५४/२०२६ अंतर्गत भादंवि कलम ३०३(२), ३२४(४) प्रमाणे चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सध्या आरोपी अज्ञात असून, पोलीस त्यांच्या शोधात आहेत. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अशा प्रकारच्या चोरीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

# उत्तर महाराष्ट्रात जीपीएसचे प्रथमच फिरते नेत्रालय जनसेवेत

### बिलखेडा-आसोदा शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद : गावोगावी 'मायेची दृष्टी'

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाळधी ता. धरणगाव** प्रतिनिधी

फिरते नेत्रालय गावागावातील गरिबांच्या दारात आरोग्य सेवा पोहोचवत आहे. जेष्ठ नागरिक असोत किंवा सर्वसामान्य, त्यांच्या कोणत्याही अडचणींसाठी मी सदैव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात ''गावातच उपचार'' ही संकल्पना प्रत्यक्ष उतरली असून अत्याधुनिक फिरते नेत्रालय आता जनतेच्या सेवेत दाखल झाले आहे. जळगाव ग्रामीण मतदार संघात जीपीएस मित्रपरिवाराने मोतीबिंदू मुक्त करण्याच्या दिशेने उचललेले हे पाऊस आरोग्यसेवा



संवेदनाने सामाजिक बांधिलकीचा जिवंत आदर्श ठरत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. धरणगाव तालुक्यातील बिलखेडा तसेच जळगाव तालुक्यातील आसोदा येथे जीपीएस मित्र परिवारतर्फे आयोजित मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बिलखेडा येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील, युवा नेते प्रतापराव पाटील व पंचायत समिती सभापती मुकुंदराव नन्नवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले. या शिबिरांमध्ये बिलखेडा येथे ३६० तर आसोदा येथे २१० नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी बिलखेडा येथील ७४ व आसोदा येथील ६० असे एकूण १३४ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडले गेले. यापैकी ९० पेक्षा अधिक रुणांना तात्काळ पनवेल येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले. यावेळी आसोदा येथे सामाजिक कार्यकर्ते तुषार महाजन, गिरीश भोळे, किशोर चौधरी, अजय महाजन, उमेश पाटील, संजोग कोळी, अनिल कोळी, जीवन सोनवणे, शरद नारखेडे, दिपक माळी, लखन जोहरे, धीरज येवले, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बिलखेडा येथे भदाणे गुरुजी, नवल भदाणे, देवसिंग राजपूत, उपसरपंच दिलीप भदाणे, महेंद्र चव्हाण, जयेश भामरे, राहुल भामरे, नंदू बदाने, पप्पू बाविस्कर, देविदास बडगुजर तसेच पोलीस पाटील संघटनेचे तालुका अध्यक्ष किशोर भदाणे, गोपाल भदाणे, गणेश भदाणे आदी मान्यवर उपस्थित होते. दोन्ही गावांतील तरुणांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य करत सहभाग नोंदवला. ग्रामस्थांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील, प्रतापराव पाटील व जीपीएस मित्रपरिवाराचे मनापासून आभार व्यक्त केले.

**पुढील शिबिरांचे वेळापत्रक**

दि. ६ मे रोजी ममुराबाद, नांद्रा, खापरखेडा, धामणगाव, तुरखेडा, आवार, ७ मे रोजी जळके, विटनेर, वराळ, सुभाषवाडी, लोणवाडी, वसंतवाडी, तर १० मे रोजी सोनवद बुद्रुक व सोनवद खुर्द येथे सकाळी ८ ते १२ या वेळेत तपासणी, शस्त्रक्रिया निवड व चष्मे वाटप शिबिरे होणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भदाणे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक भदाणे व पुरुषोत्तम भदाणे यांनी मानले.

## वाहतूक नियम निबंध स्पर्धा उत्साहात



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

प्रवक्ता अकॅडमी, पारोळा व महामार्ग पोलीस पाळधी यांच्या संयुक्त विद्यमाने ''वाहतूक नियम जनजागृती निबंध स्पर्धा'' उत्साहात पार पडली. स्पर्धेमध्ये १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला हा कार्यक्रम केवळ निबंध स्पर्धा नसून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती निर्माण करणारा, रस्ता सुरक्षिततेचा संदेश देणारा आणि जबाबदार नागरिक घडविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी ''वाहतूक नियमांचे महत्त्व'', ''अपघात टाळण्यासाठी उपाय'', ''माझा सुरक्षित प्रवास'', ''वाहतूक नियम पाळणारा आदर्श नागरिक'' आणि ''नियम पाळा, जीवन वाचवा'' या विषयांवर प्रभावी निबंध सादर करून आपले विचार मांडले. कार्यक्रमाला प्रवक्ता अकॅडमीचे संस्थापक रवींद्र पाटील, टायगर इंटरनॅशनल स्कूलचे प्रिन्सिपल पी. एस. पाटील, अजीम शेख, तसेच आजचे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महामार्ग पोलीस केंद्र पाळधीचे मुख्य प्रभारी पी. एस. आय निलेश संदानशिव साहेब, पी. एस. आय, संजय जाधव, पोलीस सुनील साळुंखे संतोष शिंदे, सलीम तडवी, हितेश पाटील इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाहतूक नियमांचे पालन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले. तसेच, वाहन चालवताना हेल्मेटचा वापर करणे, सीटबेल्ट लावणे, वेगमर्यादा पाळणे, मोबाईलचा वापर टाळणे, सिग्नलचे पालन करणे इत्यादी महत्त्वाचे नियम पाळावेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन भविष्यात सुरक्षित आणि शिस्तबद्ध समाज घडण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. तसेच, हा उपक्रम विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व समजावे, अपघात टाळण्यासाठी आवश्यक जबाबदारीची जाणीव व्हावी आणि सुरक्षित भारत घडविण्यात आपले योगदान द्यावे या उद्देशाने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमांसाठी प्रवक्ता अकॅडमी उपप्राचार्य, दीपाली शिंपी, राजश्री पाटील, रूपल सोनार, प्रणाली पाटील यांनी यांचे सहकार्य लाभले.

## अखेर प्रशासक राजने काढले लिकेज

### दैनिक लोकशाही वृत्ताची तात्काळ दखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**लोहारा ता. पाचोरा** प्रतिनिधी

ग्रामपंचायत कंपाऊंडच्या लगतच शहादल शहावली कमान व दहा पाऊल पुढे चालून अशा दोन ठिकाणी पाणी वितरण करणारी पाईपलाईन जवळपास एक महिन्यापासून लिकेज असताना प्रशासक राजचे समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक ५ मे मंगळवार रोजी दैनिक लोकशाहीने लोहारा ग्रामपंचायत लगतच लिकेज या मथळ्याखाली सचित्र वृत्त प्रकाशित केले होते. याची दखल लोहारा प्रशासकराज




लोकशाही
epaper.lokshahilive.com
JALGAON - 05 May 2026 - Page 2
एक महिन्यापासून लोहारा ग्रामपंचायत लगतच दोन ठिकाणी पाईपलाईन लिकेज
लोकशाही न्यूज नेटवर्क
लोहारा ता. पाचोरा प्रतिनिधी

दीपक शिंदे, ग्रामपंचायत अधिकारी गजानन काळे यांनी घेऊन कर्मचाऱ्यांना आदेश दिले. यामुळे सायंकाळपर्यंत दोन्ही ठिकाणचे लिकेज काढण्यात आले. वृत्तामुळे ग्रामपंचायत कर्मचारी अर्जुन पाटील ,नाना सरोदे, सुनील बाविस्कर यांना 'दिव्याखालीच अंधार' अशा म्हणीचा प्रत्यय ग्रामस्थांना अनुभवला येत होता. तात्काळ वृत्तामुळे कार्यवाही झाल्याने वाचक व ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. यामुळे ग्रामस्थांना आरोग्य विषयी सामना करावा लागणार नाही.

## शेतकी संघाच्या १५ जागांसाठी तब्बल १६२ उमेदवारी अर्ज

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी

येथील शेतकी संघाच्या आगामी निवडणुकीत उमेदवारांची मोठी उत्सुकता पाहायला मिळत असून, अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत १५ जागांसाठी तब्बल १६२ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अनेक वर्षांनंतर निवडणूक होत असल्याने इच्छुक उमेदवारांनी मोठ्या संख्येने मैदानात उतरण्याची तयारी दर्शवली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून शेतकी संघावर प्रशासक राज असल्यामुळे या निवडणुकीकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे. संघाच्या कारभारात थेट सहभाग मिळवण्यासाठी विविध मतदारसंघांतून अनेक दिग्गजांनी अर्ज भरले आहेत. त्यामुळे निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. निवडणुकीच्या कार्यक्रमानुसार, २७ एप्रिल ते ४ मे या कालावधीत उमेदवारी अर्ज स्वीकारण्यात आले. ५ मे रोजी अर्जांची छाननी होणार असून ६ मे ते २० मे या कालावधीत उमेदवारांना माघार घेण्याची संधी दिली जाणार आहे. २१ मे रोजी अंतिम उमेदवारांची यादी



जाहीर करण्यात येऊन निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल. ३० मे रोजी मतदान पार पडणार असून ३१ मे रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत एकूण १५ जागांसाठी मतदान होणार आहे. यामध्ये व्यक्ती मतदार संघासाठी ५ जागा, सोसायटी मतदार संघासाठी ५ जागा, महिला राखीव २ जागा, इतर मागासवर्ग (इमाव) १ जागा, अनुसूचित जाती/जमाती (एस.सी./एस.टी.) १ जागा आणि भटक्या जाती (एन.टी.) १ जागा राखीव आहेत. सर्वच मतदारसंघांतून तालुक्यातील प्रमुख आणि प्रभावी उमेदवारांनी अर्ज दाखल केल्यामुळे निवडणूक अत्यंत रंगतदार होण्याची शक्यता आहे. सध्या सर्वांचे लक्ष माघारीच्या प्रक्रियेकडे लागले असून, त्यानंतरच अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाळधी** प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे यांचेद्वारा फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी परिक्षेचा भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा १००%, वाणिज्य शाखेचा १००%, कला शाखेचा निकाल ९८% निकाल लागला असून महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

कला शाखेतून कु. प्रांजली किरण महाजन ही विद्यार्थिनी ८६.१७% गुण मिळवून प्रथम क्रमांकाने तर पूजा ज्ञानेश्वर भोई ही ८२.८३ % गुण मिळवून द्वितीय क्रमांकाने तसेच कु. दिपाली रवींद्र काकडे ही ७८.५०% गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.


वाणिज्य शाखेतून चि. शुभम धनराज कासट हा ८०.८३% गुण मिळवून प्रथम, तर कु. पुनम विकास पाटील ही ७९.८३.% गुण मिळवून द्वितीय, तर चि. रामचंद्र गणेश पाटील हा ७६.८३% गुण मिळून तृतीय क्रमांकाने तसेच विज्ञान शाखेतून कु. कादंबरी शामकांत पाटील ही ८७.००% गुण मिळवून प्रथम तर चि. प्रणव विठ्ठल पाटील याने ८५.८३ % गुण व कु. यज्ञा घनश्याम पाटील हिने ८५.८३ % गुण मिळवून द्वितीय क्रमांक तसेच चि. समर्थ सुगमचंद पाटील याने ८५.१७% गुण मिळून तृतीय क्रमांक मिळविला . बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा प्राचार्य, समन्वयक व शिक्षक वृंद यांच्याकडून सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय शिक्षण प्रसारक संस्थेचे प्रेरणास्रोत गुलाबराव पाटील, अध्यक्ष विक्रम पाटील, तसेच सचिव प्रतापरावजी पाटील तसेच सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य अजिंक्य जोशी, समन्वयक डी.डी. कंखरे सोबत सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचा गुणगौरव व अभिनंदन केले.

## करोडपती विद्यालयाची उत्तुंग भरारी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी








श्री बालाजी विद्या प्रबोधिनी मंडळ संचलित आप्पासाहेब यु. एच. करोडपती उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या विज्ञान शाखा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पुन्हा एकदा उत्तुंग भरारी घेतली असून विद्यालयाच्या निकाल ८८% लागला आहे. केंद्रात व विद्यालयात प्रथम येण्याचा मान कु. तनिष्का निलेश बडगुजर (करोडपती)८५.१७% हिने मिळविला तसेच विद्यालयातून –द्वितीयः ओम पी. बडगुजर, अमेय डी. कासार ७७.३३%–तृतीय: श्रावणी पी. साळुंखे – ७५.३३% –चतुर्थ: पद्येश पी. जैन, अंशुल यु, सोनजे ७५%–पाचवा: जीत पी. जैन ७४.८३% यांनी मिळविला. परीक्षेत बसलेल्या विद्याध्यांपैकी १८ विद्यार्थ्यांना ७०% पेक्षा जास्त गुण मिळविले. आय.टी. (इन्फॉमशन टेक्नॉलॉजी) या विषयात अंशुल यु. सोनजे याने ९९ गुण मिळविले तसेच आय. टी. विषय घेणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना ९० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत. सर्व गुणवंत यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यु. एच करोडपती, उपाध्यक्ष के. जे. गुजराती, सचिव डॉ. सचिन बडगुजर, संचालक डॉ. चेतन करोडपती, सर्व कार्यकारिणी मंडळ, प्राचार्य विजय बडगुजर, मुख्याध्यापक हेमंत कुमार पाटील, प्राचार्य स्वाती बलखंडे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. हिमांशू पाटील, सौ. वैशाली पाटील, निकिता पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

## शॉर्टसर्किटने चार एकर शेतीचा झाला कोळसा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी

रोहित्रावर शॉर्टसर्किट होऊन केबल जळल्याने चक्क शेतात आगीचा वणवा पेटल्याची घटना सोमवारी पहाटे पाच वाजेच्या दरम्यान घडली. सकाळी आठ वाजता हा प्रकार उघडकीस आला. या आगीत चार एकर शेतातील केळीच्या बागेसह आग लागून जनावरांचा चारा, ठिबक संच,आदी जळून कोळसा झाले आहे. घोसला शिवारात गट क्र– ३४ भैया सुभाष बोरशे यांची



शेतातील रोहित्रावर अचानक शॉर्ट सर्किटमुळे केबल जळून आगीचा वणवा शेतात पेटला. यामध्ये केळीची बाग व इतर साहित्य आणि चारा जळून खाक झाला आहे या आगीच्या घटनेत शेतकऱ्याचे तीन लाख रु चे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती हाती आली आहे. दरम्यान घटनास्थळी महावितरण व महसूल, कृषी विभागाने पंचनामा केला आहे. दरम्यान पहाटे पाच वाजेच्या सुमारास वारा होता. त्यामुळे वाऱ्याने ही शॉर्टसर्किट झाल्याने लागलेली आग शेतात पसरून चार एकर शेताचा आगीने ताबा घेतला होता. यामध्ये केळीची बाग आगीत होरपळून नुकसान झाले आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात साकळी गावाचे कौतुक

### परभणी येथील अधिकाऱ्यांकडून तालुकास्तरीय पाहणी : अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांची सरपंच दीपक पाटलांकडून माहिती

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मनवेल ता. यावल** प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाअंतर्गत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात तालुक्यातील मोठी लोकसंख्या असलेल्या साकळी गावाने सहभाग नोंदविला होता. या अभियानाच्या अंतर्गत लोकनियुक्त सरपंच दीपक नागो पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध उद्दिष्टांप्रमाणे गावस्तरावर अनेक कामे केली आहे. या गाव स्तरावर केलेल्या कामांची पाहणी करण्यासाठी परभणी येथील विशेष तपासणी अधिकारी वर्गाच्या समितीने दि. ४ रोजी साकळी येथे भेट दिली. या पाहणी समितीमध्ये पाथरी जि. परभणी येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ऋषिकेश शेखर सावंत, गटशिक्षणाधिकारी मुकेश राठोड शाखा अभियंता धनंजय कनकदांडे व विस्तार अधिकारी जी. एन. रेवनवार यांचा समावेश होता. या समितीने सुरुवातीला ग्रामपंचायतीच्या कार्यालयाला भेट दिली. यात त्यांनी ग्रामपंचायतीच्या अद्यावत संपूर्ण दप्तराची तपासणी केली. त्याचप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम, लोकसहभागातून केलेली कामे यांची माहिती घेतली. साकळी ग्रामपंचायत च्या नव्याने उपलब्ध



केलेल्या सर्व भौतिक सुख- सुविधा व आकर्षक बाह्यअंग पाहून अधिकारी वर्गाने समाधान व्यक्त केले. त्यानंतर जिल्हा परिषद मराठी शाळा, अंगणवाड्या यांना तपासणी पथकाने भेट दिली असता तेथील शैक्षणिकदृष्ट्या सुविधा पाहून कौतुक केले. या शाळांचे जुने जनरल रजिस्टर मोडी लिपीतील आहे हे रजिस्टर सरपंच दिपक पाटील, व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौरभ जैन, शिक्षकवृंद यांच्या पुढाकारातून व गावातील अनेक शिक्षणप्रेमी दात्यांच्या मदतीतून लॅमिनेशन करण्यात आले. जेणेकरून ते रजिस्टर पुढील अनेक वर्ष जसेच्या तसे पाहता येतील या कामाची अधिकारी वर्गाने आस्थेवाईक माहिती घेऊन या कामाची सुद्धा कौतुक केले. त्यानंतर गावातील कचरा संकलन शेडची पाहणी केली. गावाचा मोठ्या प्रमाणात गोळा होत असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विविध पद्धतीने कामे कसे करता येतील यावर अधिकाऱ्यांनी सूचना केल्या. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून लोककल्याणाचा ध्यास प्रशासनाने घेतला आहे. या उपक्रमांची सुद्धा माहिती अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे जाणून घेतली. गाव स्वच्छता व उपाययोजना, वृक्षारोपण, जलताराप्रकल्प, ग्रामपंचायतीची करवसुली, महिला व बालविकासाच्या करिता केलेली कामे हे अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोनातून लक्षवेधी ठरले. या तपासणी पथकातील सर्व अधिकाऱ्यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने वह्यांचा सेट व शाल भेट देऊन सत्कार करण्यात आला. या तपासणी दरम्यान यावलचे अतिरिक्त गटविकास अधिकारी के. सी. सपकाळे साहेब, विस्तार अधिकारी सुनील भदाणे उपस्थित होते. तपासणी अधिकाऱ्यांना लोकनियुक्त सरपंच दिपक पाटील, ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप धनगर, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी, गावातील शासकीय कर्मचारी यांनी गावातील विकासकामासंदर्भात माहिती दिली.

लोकशाही
'लोक'राज्य next
६
जळगाव, बुधवार दि.०६ मे २०२६
epaper.lokshahilive.com

## शिरसोलीत स्टॅम्प वेंडरचे घर फोडले!

**जळगाव :** तालुक्यातील शिरसोली प्र.बो. येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे पाच लाख रुपये किमतीचा सोन्या-चांदीचा ऐवज आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी शिक्षक कॉलनीतील स्टॅम्प वेंडर राजेंद्र दौलत आंबटकर (बारी) यांच्या घरात झाली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. स्टॅम्प वेंडर राजेंद्र आंबटकर हे पत्नीसह गेल्या शुक्रवारी पुणे येथे गेले होते. दरम्यान, त्यांचे घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा कापून आत प्रवेश केला. आज मंगळवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास आंबटकर कुटुंब घरी परतले असता, त्यांना दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले, तेव्हा चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान चोरट्यांनी घरातील धान्याच्या कोठीत लपवून ठेवलेले दागिने शोधून काढले. दोन तोळ्यांची सोन्याची मंगलपोत दीड तोळ्याची सोन्याची चेन ५ ग्रॅमचे सोन्याचे झुमके १५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण अंदाजे ५ लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

**महत्वाचे**

शिरसोलीत स्टॅम्प वेंडरचे घर फोडले!

**जळगाव :** तालुक्यातील शिरसोली प्र.बो. येथे एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सुमारे पाच लाख रुपये किमतीचा सोन्या-चांदीचा ऐवज आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी शिक्षक कॉलनीतील स्टॅम्प वेंडर राजेंद्र दौलत आंबटकर (बारी) यांच्या घरात झाली असून, या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. स्टॅम्प वेंडर राजेंद्र आंबटकर हे पत्नीसह गेल्या शुक्रवारी पुणे येथे गेले होते. दरम्यान, त्यांचे घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा कापून आत प्रवेश केला. आज मंगळवारी सकाळी ७ वाजेच्या सुमारास आंबटकर कुटुंब घरी परतले असता, त्यांना दरवाजा अर्धवट उघडा असल्याचे दिसले. घरात प्रवेश केल्यानंतर सर्व सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले, तेव्हा चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. दरम्यान चोरट्यांनी घरातील धान्याच्या कोठीत लपवून ठेवलेले दागिने शोधून काढले. दोन तोळ्यांची सोन्याची मंगलपोत दीड तोळ्याची सोन्याची चेन ५ ग्रॅमचे सोन्याचे झुमके १५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण अंदाजे ५ लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

# प्रहारचे अनिल चौधरी शिवसेनेच्या वाटेवर?

### भुसावळात राजकीय चर्चांना उधाण : लवकरच होणार प्रवेश सोहळा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांनी नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला आहे . याच पार्श्वभूमीवर, जळगाव जिल्ह्यातील त्यांचे समर्थक आणि भुसावळ शहराचे माजी प्रभारी नगराध्यक्ष अनिल चौधरी हे देखील लवकरच धनुष्यबाण हाती घेणार असल्याची चर्चा आहे.

जिल्ह्यातील राजकारणात पुन्हा एकदा मोठी हालचाल दिसू लागली आहे. बच्चू कडू यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर आता त्याचे पडसाद स्थानिक पातळीवर उमटू लागले आहेत. विशेषतः भुसावळमध्ये माजी प्रभारी नगराध्यक्ष अनिल चौधरी यांच्या संभाव्य प्रवेशामुळे राजकीय समीकरणे ढवळून निघण्याची चिन्हे आहेत. अनिल चौधरी हे नाव भुसावळच्या राजकारणात नवीन नाही. गेल्या काही दशकांत त्यांनी विविध टप्प्यांतून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. एकेकाळी शिवसेनेत सक्रिय असलेले चौधरी नंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले आणि आपल्या



बंधू माजी आमदार संतोष चौधरी यांच्या सहकार्याने त्यांनी भुसावळ-रावेर पट्ट्यात मजबूत जनाधार तयार केला. काही काळ राजकारणापासून दूर राहिल्यानंतर त्यांनी अलीकडील नगरपालिका निवडणुकांमध्ये पुन्हा सक्रिय भूमिका घेतली आणि सत्ता देखील मिळविली आहे.

या संभाव्य पुनरागमनाचे महत्त्व केवळ पक्षबदलापुरते मर्यादित नाही. भुसावळ नगरपालिकेत सध्या शिवसेनेची ताकद मर्यादित असली तरी अनिल चौधरींसारख्या अनुभवी आणि जनाधार असलेल्या नेत्याच्या प्रवेशामुळे पक्षाला नवसंजीवनी मिळू शकते. सध्या माजी नगरसेवक दीपक धांडे आणि नगरसेविका शारदा धांडे हे स्थानिक पातळीवर पक्षाची जबाबदारी सांभाळत असले तरी मोठ्या नेतृत्वाच्या आगमनाने समीकरणे वेगाने बदलू शकतात. चौधरी बंधू एकत्रितपणे शिवसेना (शिंदे गट) मध्ये दाखल झाले तर तो केवळ प्रवेश न राहता शक्तिप्रदर्शन ठरू शकतो. या सर्व घडामोडींमध्ये गुलाबराव पाटील यांची भेटही निर्णायक ठरू शकते. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांचा प्रभाव लक्षात घेता, चौधरींच्या प्रवेशानंतर शहराच्या विकासाच्या दृष्टीनेही नवे दरवाजे उघडतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. दरम्यान, या संभाव्य बदलामुळे भाजपसमोर नवे आव्हान उभे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. भुसावळसारख्या राजकीयदृष्ट्या संवेदनशील शहरात जर शिवसेनेची ताकद वाढली, तर आगामी निवडणुकांमध्ये चित्र पूर्णपणे बदलू शकते. सध्या सर्वांचे लक्ष एका प्रश्नावर खिळले आहे. अनिल चौधरी खरोखरच 'धनुष्यबाण' हाती घेणार का? आणि जर घेतलाच, तर त्यांचा पुढचा राजकीय निशाणा कोणावर असेल? या प्रश्नांची उत्तरे मिळाली, तर भुसावळच्या राजकारणात नवा अध्याय सुरू होवू शकतो.

## विजेचा ताण कमी करण्यासाठी 5 नवीन सबस्टेशन

### महापौर दीपमाला काळेंचा पुढाकार : अधिकाऱ्यांची घेतली बैठक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील वाढत्या विजेच्या ओव्हरलोडच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापौर दीपमाला काळे यांनी पुढाकार घेत सोमवारी बैठक घेतली. या बैठकीत शहरात प्रस्तावित असलेल्या पाच नवीन सबस्टेशन उभारणीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली असून, कामांना लवकरच गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बैठकीला महावितरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता दत्तात्रय साळी, कार्यकारी अभियंता जी. टी. महाजन, अधिकारी अजय वाणी, देवेंद्र भंगाळे, चेतन सोनार, महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचे संदीप मोरे उपस्थित होते. यावेळी शहरातील विजेच्या समस्यांचा आढावा घेऊन त्यावर ठोस उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. महावितरण विभागाकडून यापूर्वीच काही सबस्टेशनचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते आणि त्यांना मंजुरीही मिळाली होती. मात्र, मागील प्रशासकीय कार्यकाळात या प्रस्तावांची अंमलबजावणी झाली नसल्याने नागरिकांना विजेच्या तक्रारींना सामोरे जावे लागत होते. महावितरण आणि महानगरपालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे ही कामे प्रलंबित राहिल्याचेही बैठकीत स्पष्ट झाले.

या पार्श्वभूमीवर महापौरांनी पुढाकार घेत सबस्टेशन उभारणीसाठी पर्यायी जागांची यादी महापालिकेकडून सादर केली आहे. या जागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी पुढील दोन दिवसांत महावितरण आणि महापालिकेचे अधिकारी संयुक्त दौरा करणार आहेत. पाहणीनंतर तातडीने अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे महापौरांनी स्पष्ट केले. शहरातील वाढत्या विजेच्या मागणीच्या पार्श्वभूमीवर ही पाच नवीन सबस्टेशन उभारणीची योजना अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, यामुळे ओव्हरलोडची समस्या कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आयशर चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा : मुक्ताईनगर पोलिसांची कारवाई

## वाहनाला लावलेले लोखंडी अँगल ठरले काळ!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

मुक्ताईनगर परिसरात काल झालेल्या एका हृदयद्रावक अपघातात पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची लहान मुलगी गंभीर जखमी झाली. या अपघाताचा सखोल तपास केल्यानंतर, केवळ रस्ते अपघाताचा गुन्हा दाखल न करता पोलिसांनी आता कठोर पाऊल उचलले आहे. केळी वाहून नेण्यासाठी आयशर गाडीला बेकायदेशीरपणे लावलेल्या लोखंडी पट्ट्यांमुळे (अँगल) हा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाल्याने, पोलिसांनी संबंधित चालकावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. केळीची वाहतूक करण्यासाठी अनेक वाहनधारक मालवाहू गाड्यांच्या बाजूला लोखंडी पट्ट्या किंवा तीक्ष्ण अँगल बसवतात. मुक्ताईनगरच्या अपघातात हेच लोखंडी अँगल निष्पाप कुटुंबासाठी काळ ठरले. केवळ जास्त माल भरण्याच्या हव्यासापोटी वाहनांच्या रचनेत केलेले हे बेकायदेशीर बदल लोकांच्या जीवावर बेतत आहेत. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आता केवळ अपघाताचे कलम न लावता नवीन भारतीय न्याय संहितेनुसार कारवाई सुरू केली आहे. मुक्ताईनगर पोलिसांनी घेतलेल्या या निर्णयामुळे वाहनधारकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः केळी उत्पादक पट्ट्यात मालवाहू गाड्यांना लोखंडी अँगल लावण्याचे प्रमाण मोठे आहे. आता अशा प्रकारे वाहनात घातक बदल करणाऱ्या मालक आणि चालकांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

## आयडीई बुट कॅम्पमध्ये गोदावरी अभियांत्रिकीचे यश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

येथील गोदावरी फाऊंडेशन संचलित गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय जळगावच्या विद्यार्थ्यांनी -आयसीटीई आणि एमआयसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आयडीई बुटकॅम्प एडीशन ३ फेस २ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पारितोषिक पटकावले. हा बूटकॅम्प माधव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स ग्वालियर (मध्यप्रदेश) येथे पार पडला.

या उपक्रमामध्ये देशभरातील निवडक विद्यार्थ्यांना नवोपक्रम, डिझाईन आणि उद्योजकता क्षेत्रात कौशल्य विकसित करण्याची संधी देण्यात आली. या बूटकॅम्पमध्ये गोदावरी अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव येथील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांमध्ये द्वितीय वर्ष संगणक विभागाचे राज सुनिल सूर्यवंशी, विवेक चंद्रकांत ठाकूर, निशात किरण पाटील, कृष्णा ठोंबरे यांचा समावेश होता. या विद्यार्थ्यांना प्रा. कल्पेश वाणी, प्रा. किरण बाविस्कर आणि प्रा. राजनंदिनी चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण स्टार्टअप आयडियावर काम करून त्याचे प्रभावी सादरीकरण केले. या बूटकॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना आयडिया व्हॅलिडेशन, प्रोटोटाइप डेव्हलपमेंट, बिझनेस मॉडेल कॅनव्हास, प्रॉडक्ट डिझाईन, फायनान्शियल लिटरसी तसेच पिचिंग स्किल्स याबाबत तज्ज्ञांकडून सखोल मार्गदर्शन मिळाले.

## बनावटगिरी करुन उर्दू एज्युकेशन सोसायटी हडपण्याचा कट उधळला!

### धर्मादाय उपायुक्तांकडून खोटा फेरफार अर्ज फेटाळला : अध्यक्ष अलिम शिरपूरकर यांचे निवेदन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धरणगाव** प्रतिनिधी

येथील नामांकित धरणगाव उर्दू एज्युकेशन सोसायटीवर कब्जा मिळवण्यासाठी रचलेला बनावट कागदपत्रे आणि खोट्या शियांचा कुटील डाव धर्मादाय उपायुक्तांनी उधळून लावला लावल्याचा दावा संस्थेचे अध्यक्ष अलिम शिरपूरकर आणि सचिव एजाज खान यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केला आहे. संस्थेचे साधे सभासद नसतांनाही खोटे फेरफार अर्ज दाखल करणाऱ्या मोहम्मद नईम अख्तर अब्दुल हमीद काजी यांना मोठा दणका देत, धर्मादाय उपायुक्त जळगाव यांनी दि. ८ एप्रिल २०२६ रोजी हा बनावट अर्ज फेटाळून लावल्याचे अंतरिम अलिम शिरपूरकर आणि आणि एजाज खान यांनी पत्रकात म्हटले आहे.

मोहम्मद नईम अख्तर अब्दुल हमीद काझी यांनी संस्थेच्या अध्यक्ष आणि सचिवांच्या नावाचे बनावट शिक्के तयार केले होते. या खोट्या शियांच्या आधारे त्यांनी संस्थेवर आपला अधिकार सांगण्यासाठी धर्मादाय उपायुक्त कार्यालय, जळगाव येथे फेरफार अर्ज क्र. १०२/२०१५ दाखल केला होता. विशेष म्हणजे, मोहम्मद नईम हे या संस्थेचे साधे 'सर्वसाधारण सभासद' देखील नसतांना त्यांनी हे धाडस केले होते. संस्थेची सत्ता बेकायदेशीररीत्या काबीज करण्याच्या उद्देशाने हा संपूर्ण बनावटगिरीचा खेळ मांडण्यात आला होता असा दावा संस्थेचे अध्यक्ष अलिम शिरपूरकर आणि सचिव एजाज खान यांनी पत्रकात केला आहे.

हा बनावट प्रकार लक्षात येताच धरणगाव उर्दू एज्युकेशन सोसायटीचे तत्कालीन उपाध्यक्ष शफी अहमद भाईमिया काझी यांनी तातडीने या अर्जावर हरकत घेतली. त्यांनी कायदेशीर मार्गाने हा लढा लढण्याचा निर्धार केला. या प्रकरणी अ‍ॅड. डी. ओ. पाटील यांनी भक्कम पुराव्यांसह बाजू मांडली. मोहम्मद नईम यांनी केलेले दावे हे पुराव्यांच्या आधारे कसे खोटे आहेत आणि शिक्के बनावट कसे आहेत, हे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर धर्मादाय उपायुक्तांनी हा बनावट अर्ज फेटाळून लावत सत्य समोर आणल्याचा दावा श्री.शिरपूरकर आणि श्री. खान यांनी केला आहे.

### संशयितांवर फौजदारी गुन्ह्यांचा विळखा

केवळ फेरफार अर्ज नामंजूर झाला असे नाही, तर खोटे शिक्के बनवणे आणि संस्थेत घुसखोरी करण्याच्या प्रयत्नात मोहम्मद नईम अख्तर यांच्यासह इतर ५ जणांवर धरणगाव पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड विधानाच्या कलम ३५३, ४१७, ४६५, ४६८, ४७१ (बनावटगिरी आणि फसवणूक), तसेच १४३, १४७, ४४८, १८६, ३२३, ५०४ व ५०६ नुसार गुन्हे नोंदवण्यात आल्याचा दावा ही शिरपूरकर आणि खान यांनी केला आहे. शिक्षण संस्थेसारख्या पवित्र ठिकाणी अशा प्रकारे बनावटगिरी करून संस्था हडपण्याचे प्रयत्न झाल्याने धरणगाव शहरात संताप व्यक्त केला जात असून धर्मादाय उपायुक्तांच्या या निकालामुळे दूध का दूध आणि पाणी का पाणी झाले असून, खऱ्या पदाधिकाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले असल्याचे अध्यक्ष अलिम शिरपूरकर आणि सचिव एजाज खान यांनी पत्रकात शेवटी म्हटले आहे.

## पत्र्याच्या घरांतील तापमानात 10 अंशांनी घट

### कूल रूफ सोल्युशनचा शुभारंभ : शहरातील चारशे घरांवर सोलर रिफ्लेक्टिव्ह पेंट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

शहरातील वाढत्या उष्णतेला आळा घालण्यासाठी आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्रातील उष्णता व पाणी ताण कमी करण्यासाठी निसर्ग आधारित उपाय या प्रकल्पांतर्गत कूल रूफ सोल्युशन उपक्रमाचा शुभारंभ महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते समता नगर येथे पार पडला. या उपक्रमामुळे घरांच्या तापमानात तब्बल १० अंश सेल्सिअसपर्यंत घट झाल्याचे समोर आले आहे.

ऑल इंडिया डिझास्टर मेटिगेशन इन्स्टिट्यूट, अहमदाबाद, प्रॅक्टिकल अ‍ॅक्शन, कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था आणि जळगाव महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने या प्रकल्पांतर्गत पत्र्याच्या घरांवर विशेष सोलर रिफ्लेक्टिव्ह रंगाचा डबल कोट दिला जातो. यामुळे सूर्याच्या किरणांचे परावर्तन होऊन घरातील तापमान लक्षणीयरीत्या कमी राहते. कार्यक्रमाची सुरुवात



सकाळी साडेदहा वाजता झाली. महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते प्रकल्पाच्या बॅनरचे अनावरण करून उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समिती सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, उपायुक्त धनश्री शिंदे, उपआयुक्त पंकज गोसावी, नगरसेवक नितीन बरडे, उज्वला बेंडाळे आणि गायत्री राणे यांच्यासह इतर अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी प्रत्यक्ष रंग केलेल्या आणि न केलेल्या घरांमधील तापमान मोजले. यावेळी रंग केलेल्या घरांतील वातावरण लक्षणीयरीत्या थंड असल्याचे आढळले असून, दोन्ही घरांच्या तापमानात सुमारे १० अंश सेल्सिअसचा फरक दिसून आला.

## फसवणूक करणारी आंतरजिल्हा टोळी गजाआड!

### एटीएम कार्डची अदला बदल : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

एटीएम सेंटरमध्ये पैसे काढण्यासाठी आलेल्या नागरिकांचे लक्ष विचलित करून, हातचलाखीने त्यांचे एटीएम कार्ड बदलून लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश करण्यात जळगावच्या स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. याप्रकरणी धुळे येथून एका सराईत भामट्याला रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्याचा मुंबईतील सराईत साथीदार फरार आहे.

याबाबत असे की, दि. २६ मार्च २०२६ रोजी जळगाव शहरातील बेंडाळे चौक परिसरातील एसबीआयच्या एटीएममध्ये एक तक्रारदार नागरिक पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी तेथे आलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांचे लक्ष विचलित करून अतिशय हातचलाखीने त्यांचे मूळ एटीएम कार्ड बदलून बनावट कार्ड त्यांच्या हाती दिले. त्यानंतर या आरोपीने आणि त्याच्या साथीदाराने त्या मूळ कार्डचा वापर करून धुळे, नंदुरबार आणि मालेगाव येथील विविध एटीएममधून तब्बल २ लाख ३१ हजार रुपये काढून फसवणूक केली. याप्रकरणी जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३१८(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना तपासाचे आदेश दिले. गायकवाड यांनी तत्काळ वेगवेगळी पथके तयार करून तपासाला गती दिली. पोलिसांनी घटनास्थळावरील आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची अत्यंत बारकाईने पाहणी केली. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या पया माहितीच्या आधारे पोलिसांना आरोपींचे धागेदोरे धुळे येथे मिळाले. धुळे येथे एटीएम सेंटरमध्ये पुन्हा दुसऱ्या नागरिकाला गंडा घालण्याच्या तयारीत असतानाच पोलिसांनी शेख हबीब शेख नवाब (वय ५४, रा. लाला सरदार नगर, धुळे) याला शिताफीने ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीची चौकशी केली असता, या गुन्ह्यात त्याचा दुसरा साथीदार सैय्यद कमालुद्दीन खान (वय ३५, रा. साकीनाका, अंधेरी, मुंबई) हा सामील असल्याचे निष्पन्न झाले आहे. तो सध्या फरार आहे. विशेष म्हणजे या फरार आरोपीवर मुंबई आणि नवी मुंबई (कांदिवली, कामोठे, कळंबोली, वाशी, कापूरबावडी इ.) परिसरात फसवणुकीचे १० हून अधिक गंभीर गुन्हे आधीच दाखल आहेत. जळगाव पोलीस आता त्याचा कसून शोध घेत आहेत.

## ऑटोरिक्षा, मिटर टॅक्सी चालकांनी योजनांचा लाभ घ्यावा!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

गृह परिवहन विभागामार्फत महाराष्ट्र राज्यांतर्गत नोंदणी कृत परवानाधारक ऑटोरिक्षा व मिटर टॅक्सी चालकांसाठी धर्मविर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थपना करण्यात आलेली आहे. मंडळ परिवहन विभागाच्या अंतर्गत असुन केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना राबविणे हा मंडळाचा मुख्य उद्देश आहे.

जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत मंडळासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून, महाराष्ट्र राज्यातील परवानाधारक ऑटोरिक्षा व मिटर टॅक्सी चालक, अनुज्ञप्ती व बिल्लाधारक तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना या योजनांचा लाभ मिळणार आहे. मंडळाचे वार्षिक सभासद नोंदणी व ओळखपत्र शुल्क ८०० रुपये निश्चित करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत जिवन विमा व अपंगत्व विमा योजना, आरोग्यविषयक लाभ, कर्तव्यावर असतांना दुखापत झाल्यास पन्नास हजारापर्यंत अर्थसहाय्य, पाल्यांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, कामगार कौशल्य वृध्दी, ६५ वर्षावरील ऑटोरिक्ष, मिटर टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान, नविन ऑटोरिक्षा, मिटर टॅक्सी खरेदी व गृह खरेदीसाठी कर्ज योजना, राज्यस्तरीय मंडळाने वेळोवेळी मान्यता दिलेल्या इतर कल्याणकारी योजना, शासनाने निर्देशित केलेल्या इतर कल्याणकारी योजना, लाक्षणिक योजना व्यतरीक्त शासनाने घोषीत केलेल्या अनुषंगीक योजना राज्यस्तरीय मंडळाच्या मान्यतेनुसार इतर पूरक कल्याणकारी योजनाही वेळोवेळी राबविण्यात येणार आहेत.